## अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार



**पुणे :** लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे दरवर्षी लोकमान्यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिला जाणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार यंदा देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना जाहीर करण्यात आला आहे. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी पत्रकार परिषदेत याची घोषणा केली. यंदा १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांची १०६वी पुण्यतिथी आहे. त्या दिवशी दुपारी १२ वाजता मुकुंदनगर येथील कटारिया हायस्कूलच्या मैदानावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते डोवाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप असून १९८३पासून हा पुरस्कार प्रदान केला जात आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ४
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ मंगळवार, २१ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


माथेरान घाटरस्त्यावर सुरक्षा भिंत कोसळली/२

ईडब्ल्यूएस घरांसाठी संगणकीय सोडत/६

रोहित शर्माचे लॉर्ड्सवर ऐतिहासिक शतक/८


# सरकारची 'सीजेपी' प्रतिनिधींशी चर्चा

## आंदोलन मागे घेऊन परिस्थिती पूर्ववत करण्याचे आवाहन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीत कॉक्रोच जनता पक्षाचे (सीजेपी) आंदोलन सुरू असताना सोमवारी (दि.२०) केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी 'सीजेपी'च्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेऊन आंदोलन मागे घेण्याची आणि परिस्थिती सामान्य करण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती केली.



शैक्षणिक विषयावर उपोषण करणारे पर्यावरणवादी आणि शिक्षण चळवळीचे समर्थक सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असल्याने १८ जुलै रोजी त्यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी जंतरमंतरवर उपोषण सुरू केले होते. वांगचुक यांच्या विनंतीनंतर दीपके यांनी सोमवारी उपोषण सोडले, मात्र या आंदोलनाला तीव्र वळण लागले. आंदोलनकर्त्यांनी संसदेच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला, मात्र सध्या संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने कायदा-सुव्यवस्थेच्या कारणावरून पोलिसांनी त्यांना अडवले. जमावाला पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज आणि अश्रूधुराच्या नळकांड्यांचा वापर करावा लागला.

पोलिसांनी आंदोलकांना संसद मार्ग आणि कर्तव्यपथावरून हटवल्यानंतर ते दिल्लीच्या मध्यवर्ती कॅनॉट प्लेस परिसरात पालिका बाजार आणि सेंट्रल पार्क भागात जमले. यावेळी काहींनी पोलिसांनाच लक्ष्य केले तसेच अचानक दगडफेक करायला सुरुवात केली. यात वाहनांचीही तोडफोड झोली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनीही बळाचा वापर केला आणि आंदोलकांना पांगवले.

दरम्यान, केंद्र सरकारच्या वतीने आंदोलकांशी संपर्क साधण्यात आला. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. बैठकीनंतर मंत्री नड्डा म्हणाले, आंदोलकांच्या शिष्टमंडळाने आज पहिल्यांदाच सरकारशी चर्चेचा प्रस्ताव मांडला. सकाळी ११.५०पासून आमची सविस्तर चर्चा सुरू होती. अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात ही बैठक पार पडली. सुरुवातीला तोंडी चर्चा झाल्यानंतर दुपारी ४च्या सुमारास त्यांनी आपल्या मागण्यांचे लेखी निवेदन सोपवले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांना उपोषण मागे घेण्याची आणि परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याची विनंती सरकारच्या वतीने करण्यात आली आहे.

# मराठी भाषा जतन, संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा राबवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी भाषा, साहित्य आणि विविध बोलींचे जतन तसेच संवर्धन करण्यासाठी एक सर्वसमावेशक व प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २०) दिले. त्याचप्रमाणे राज्य मराठी विकास संस्थेच्या दैनंदिन कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि गुणात्मकता आणण्याच्या दृष्टीने वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकांचे वेळापत्रक आधीच निश्चित करण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला मराठी भाषामंत्री उदय सामंत, विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते यांच्यासह नियामक मंडळाचे अशासकीय सदस्य प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

राज्य मराठी विकास संस्थेने आपली सर्व वैधानिक अनुपालने यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. संस्थेचा गेल्या काही वर्षांतील प्रशासकीय व वैधानिक अनुशेष आता पूर्ण झाला असून यामुळे प्रशासकीय चौकट अधिक बळकट झाली आहे. त्यामुळे आता केवळ कार्यालयीन कामकाजात न गुंतता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धनासाठी



ठोस धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही सकारात्मकतेने सोडवले जातील, असे त्यांनी आश्वस्त केले.

या बैठकीत सदस्यांनी मराठी भाषा आणि विविध प्रादेशिक बोलींच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडले. यामध्ये 'पुस्तकांचे गाव' आणि 'पेटी वाचनालय' या उपक्रमांची व्याप्ती वाढवून आदिवासी व सीमावर्ती भागांतील मराठी शाळांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहचवणे, झाडीबोली आणि पूर्व विदर्भातील समृद्ध नाट्यपरंपरेला राजाश्रय देण्यासाठी गडचिरोली-वडसा परिसरात हक्काचे नाट्य संकुल उभारणे तसेच भारूड, गोंधळ, पोवाडा यांसारख्या पारंपरिक लोककलांच्या माध्यमातून मराठीचा सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवणे आणि बालसाहित्याला प्रोत्साहन देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. या सर्व सूचनांवर सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

मराठी भाषेचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी शासन स्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली.

### ■ मोडी लिपीच्या डिजिटायझेशनचा आढावा

तंजावर येथील मोडी लिपीत असलेल्या सुमारे १५ लाख ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी घेतला आणि या कामाला अधिक गती देण्याचे आदेश दिले. यासोबतच लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या जागतिक मराठी केंद्राच्या कामाचा आढावा घेऊन हा प्रकल्प वेगाने पूर्ण करण्याबाबत नियामक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.

# समृद्धी महामार्गावर ट्रकची कारला धडक

## एकाच कुटुंबातील तिघांसह सहा जणांचा मृत्यू

**वर्धा : प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वर्धा जिल्ह्यातील विरूळ इंटरचेंजवळ सोमवारी (दि.२०) पहाटे भरधाव ट्रकने कारला धडक दिली. यानंतर आग लागून सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तिघांसह कारचालक आणि ट्रकमधील दोघांचा समावेश आहे.



इथेनॉलने भरलेला एक ट्रक सोमवारी मध्यरात्री समृद्धी महामार्गावर उलटल्याने वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. यावेळी मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने कारला धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यानंतर आग लागली. यात कारमधील राजेश टिपले, पत्नी सुषमा टिपले, मुलगी जान्हवी टिपले आणि चालक अंकुश राऊत (सर्व रा. सालोड-हिरापूर, जि. वर्धा) यांचा जागीच अंत झाला. याशिवाय ट्रकचालक संजय कुमार आणि क्लीनर समरजित पाल (दोघेही रा. उत्तर प्रदेश) यांचाही मृत्यू झाला.

राजेश टिपले त्यांच्या दुसऱ्या जुळ्या मुलीला पुण्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाला होता. तिला पुण्यात सोडून व शुभेच्छा देऊन कुटुंबातील इतर चौघे पुन्हा घरी निघाले असताना त्यांच्यावर काळाने झडप घातली.

# मुंबईत १५ दिवसांसाठी जमावबंदी

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईतही १५ दिवसांसाठी जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत.

दिल्लीतील घडामोडींचे पडसाद उमटू नयेत आणि दैनंदिन जीवनशैली सुरळीत राहावी यासाठी मुंबई पोलिसांनी २३ जुलै ते ६ ऑगस्टदरम्यान शहरात जमावबंदी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या आदेशानुसार विनापरवानगी पाच किंवा त्याहून अधिक लोकांना एकत्र येण्यास, मोर्चे काढण्यास किंवा सार्वजनिक सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. आगामी काळातील विविध कार्यक्रम आणि नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊनच निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता मुंबई पोलिसांना आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन गृहविभागाकडून करण्यात आले आहे.

## निवडक

### त्रिपुरा पोलीस महासंचालकांचा मुख्यालयातच आढळला मृतदेह

**आगरतळा :** त्रिपुराचे पोलीस महासंचालक अनुराग धनकड यांचा मृतदेह सोमवारी (दि. २०) आगरतळा येथील पोलीस मुख्यालयातील त्यांच्याच कक्षात संशयास्पद स्थितीत आढळला. त्यांनी जीवन संपविले असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून धनकर यांच्या मृत्यूमागील नेमके कारण आणि परिस्थिती शोधण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यावर पुण्यात अंत्यसंस्कार

**पुणे :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, लेखक आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. कुमार सप्तर्षी यांचे शनिवारी (दि.१८) सायंकाळी वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी (दि.२०) पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अनेक मान्यवर आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रायगडातील धरणांमध्ये ९०.६१ टक्के पाणीसाठा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाने शनिवारपासून पुनरागमन केले. जिल्ह्यात सोमवारी (दि.२०) सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये ४१.६ मिमीच्या सरासरीने पाऊस पडला. लघुपाटबंधारे विभागाची २१ धरणे शंभर टक्के भरली असून या धरणांमध्ये ९०.६१ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे.

आठ दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. शनिवारपासून पावसाने पुन्हा हजेरी लावली. रविवारीदेखील अधूनमधून मध्यम स्वरूपाच्या सरी पडत होत्या. मागील दोन दिवसांपासून रायगडात चांगला पाऊस पडत आहे. या समाधानकारक पावसामुळे बळीराजा सुखावला असून खोळंबलेल्या शेतीकामांना पुन्हा वेग आला आहे.

जिल्ह्यात सोमवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत ४१.६ मिमी सरासरी पावसाची नोंद झाली. जून महिन्यात सरासरीच्या ५१.२ टक्के पाऊस पडला होता. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पडलेल्या पावसाने जून महिन्याची तूटदेखील भरून काढली. जुलै महिन्याच्या सरासरीच्या १७३.९ टक्के पाऊस झाला आहे, तर आतापर्यंत वार्षिक पर्जन्यमानाच्या ५३.६ टक्के पाऊस पडला आहे. मागील वर्षी जुलै महिन्यात वार्षिक पर्जन्यमानाच्या ७६.९ टक्के पावासाची नोंद झाली होती.

लघुपाटबंधारे विभागाच्या २८ धरणांपैकी २१ धरणे पूर्णपणे भरली आहेत. फणसाड, वावा, सुतारवाडी, आंबेघर, कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, कुडकी, पाभरे, संदेरी, वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, भिलवले, कलोते-मोकाशी, डोणवत, मोर्बे, बामणोली ही धरणे शंभर टक्के भरली आहेत. या धरणांमध्ये ९०.६१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

# गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत 'सीकेटी'चे यश

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोल्हापूर येथील गुरुकुल एज्युकेशन सोसायटीच्या वतीने गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा गुणगौरव समारंभ खांब रोहा येथे आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण महाराष्ट्रात ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

सीकेटी विद्यालयातील सौम्या अमित पाटील, वेद मिलिंद नामे, सार्थक सुहास माने या तीन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय पारितोषिक मिळवत प्रत्येकी एक हजार रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त केले; तर पल्लव आशिष म्हात्रे, हर्षद धीरज पाटील, रौनक मनोहर पाटील, तनिषा



नितीन देवाडकर, अर्णव सचिन आवटी, अंकुश अभिजित सामंत, दुर्वा देविदास पाटील, मृण्मयी प्रशांत गोसावी, अर्णव श्रीपत घरत या नऊ विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय पारितोषिकासह चषक व प्रमाणपत्र मिळविले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्याचबरोबर सरोज जितेकर यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, सीकेटी विद्यालयाचे निरीक्षक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवारात भात लावणीची लगबग

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पावसाच्या पुनरागमनामुळे शेतीकामांना वेग आला आहे. हिरवागार निसर्ग, पावसाचे आल्हाददायक वातावरण आणि चिखलाने भरलेली शेती यामध्ये पारंपरिक पद्धतीने सुरू असलेली लावणी पाहताना ग्रामीण संस्कृतीचे सुंदर दर्शन घडत आहे.



अनेक गावांमध्ये आजही आधुनिक यंत्रसामग्रीपेक्षा पारंपरिक पद्धतीला अधिक प्राधान्य दिले जाते. बैलांच्या सहाय्याने शेतीची मशागत, हाताने रोपांची लावणी आणि एकमेकांच्या सहकार्याने पार पडणारी कामे ही ग्रामीण जीवनातील जिवंत परंपरा असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

लावणीच्या दिवसांत गावातील वातावरणच बदलून जाते. नातेवाईक, शेजारी व मित्रमंडळी एकत्र येऊन शेतीची कामे करताना श्रमासोबत आनंदही वाटून घेतात. दिवसभराच्या कष्टानंतर बांधावर बसून केलेले साधे जेवणही त्या क्षणी पंचपक्वान्नांपेक्षा अधिक रूचकर वाटते. मातीचा सुगंध, पावसाच्या सरी आणि शेतात घुमणारा आवाज प्रत्येकाच्या मनात कायमस्वरूपी आठवणी कोरून ठेवतो.

शेतकरी सांगतात की, चिखलात पाय रोवून काम करत असताना अंगावर कोसळणाऱ्या पावसाच्या सरी हा अनुभव शब्दांत मांडणे कठीण आहे. कष्ट आणि निसर्ग यांचा सुंदर संगम म्हणजे भातलावणी. या कामातून केवळ शेतीच नव्हे तर माणुसकी, सहकार्य आणि ग्रामीण संस्कृतीची ओळख अधिक दृढ होते. आजच्या आधुनिक युगात यांत्रिकीकरण वाढले असले तरी ग्रामीण भागात पारंपरिक शेतीची ओळख अजूनही कायम आहे. वरुणराजाच्या पुनरागमनामुळे शेतीला नवसंजीवनी मिळून बळीराजा सुखावला आहे.

## नेत्रदीपक रिंगण सोहळा



**सोलापूर :** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे सोमवारी अकलूज येथे आगमन झाले. यावेळी येथील सदाशिव माने विद्यालयाच्या भव्य मैदानावर पारंपरिक रिंगण सोहळा झाला. त्याची प्रसिद्ध छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.

# माथेरान घाटरस्त्यावर सुरक्षा भिंत कोसळली; डोंगर खचू लागला, घाटरस्ता ढासळण्याची भीती



**नेरळ : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने माथेरान घाटरस्त्याच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील लव्हाळीवाडीकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यालगत आणि माथेरान घाटरस्त्याच्या संरक्षणासाठी उभारण्यात आलेली सुरक्षा भिंत आज सकाळी कोसळली. भिंत तुटल्याने डोंगराचा काही भागही खचला असून, घाटरस्ता आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

सदर सुरक्षा भिंत वनविभागाच्या जागेत घाटरस्ता सुरक्षित राहावा तसेच खालील वस्तीतील नागरिकांच्या संरक्षणासाठी उभारण्यात आली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मातीची मोठ्या प्रमाणात धूप झाली. त्यातच घाटरस्त्यावरून सतत सुरू असलेल्या वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आणि अखेर भिंतीवरचा दाब वाढल्याने ती कोसळल्याचे प्राथमिक कारण समोर येत आहे. विशेष म्हणजे, याच ठिकाणापासून काही अंतरावर काही दिवसांपूर्वीही अशीच सुरक्षा भिंत कोसळली होती. त्यावेळी मातीचा मोठा मलबा लव्हाळीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आल्याने आदिवासी वाडीचा संपर्क काही काळ तुटला होता. त्या घटनेनंतरही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

आता पुन्हा दुसऱ्या ठिकाणी सुरक्षा भिंतीला मोठे भगदाड पडल्याने माथेरान घाटरस्त्याच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, "सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून मुसळधार पाऊस कायम राहिल्यास रात्रीतूनही घाटरस्त्याचा काही भाग ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही." परिसरातील नागरिकांनी वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, भिंतीची दुरुस्ती तातडीने हाती घ्यावी आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी घाटरस्त्याची सुरक्षा तपासावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही, तर पुढील मुसळधार पावसात माथेरान घाटरस्त्यावर मोठी दुर्घटना घडण्याची भीती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.



**खोपोली : खोपोलीकरांचे आराध्य दैवत वीरश्वर मंदिरात बारा किलो चांदीची चोरी प्रकरणात रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे, ऐतिहासिक पेशवेकालीन वीरेश्वर मंदिरात झालेल्या चोरीने समस्त खोपोलीसह रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आज खोपोली शहराच्या दौऱ्यावर होते त्यांनी विरेश्वर मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. व झालेल्या प्रकरणाची कार्यकर्त्यांकडून माहिती घेतली, यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, शहराध्यक्ष अजय इंगुलकर, नगरसेविका अश्विनी अत्रे, मोहसीना शेख, सरचिटणीस विनायक माडपे, विकास कुरपुडे,. सुनीती महर्षी इत्यादी अनक मान्यवर उपस्थित होते. अविनाश कोळी यांनी गगनगिरी महाराजांच्या मंदिरात दर्शन घेतले. (छाया : जयवंत माडपे)**

## रिक्षा अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

पेण खोपोली मार्गावर ऋषीवन समोर कार आणि रिक्षा अपघातात १ ठार तर रिक्षा चालक गंभीर जखमीं झाला. जखमीला खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु त्याची प्रकृती गंभीर असल्याने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.रिक्षा चालकाचे नाव रवींद्र देशमुख रा. कान्हीवली पेडली सुधागड पाली असे असून ठार झालेल्या इसमाची अद्याप ओळख पटू शकली नाही. कार चालकाचा पोलीस शोध घेत आहेत.

## तळा शहरातील पुसाटी व कुंभार आळीतील विजेची उपकरणे नादुरूस्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील पुसाटी व कुंभार आळी येथील अनेक विद्युत ग्राहकांचे विजेचा दाब वाढल्याने अनेक ग्राहकांच्या विजेवर चालणाऱ्या उपकरणांचे नुकसान झाले असून सदर वस्तूंची भरपाई करून देण्याची मागणी केली जात आहे.

तळा शहरात १९ जुलैच्या रात्री १ ते २ वाजेच्या दरम्यान ओव्हरलोड मुळे अनेक ग्राहकांच्या घरातील फ्रीज,पंखे,विद्युत उपकरणे बंद पडून मोठे नुकसान झाले आहे.यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होऊन हा विद्युत मंडळाचा हलगर्जी पणा




असल्याचे नागरिक म्हणत असून या गावांतील गरीब गरजूंचे नुकसान झाल्याने ज्या वस्तू या विद्युत प्रवाहाच्या अधिकच्या दाबामुळे बंद पडल्या आहेत त्यांची भरपाई विद्युत मंडळांनी द्यावी अशी मागणी नागरिक व बांधीत ग्राहकांकडून होत आहे.वीजेचा दिवसभर लपंडाव सुरूच आहे.

# आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारत संयुक्त विजेता ; पाच विद्यार्थ्यांना 'सुवर्ण'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलंबियातील बुकारामंगा येथे झालेल्या ५६व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड (आयपीएचओ)मध्ये भारताच्या संघातील पाचही सदस्यांनी सुवर्णपदके जिंकल्याने देशाने संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राच्या (एचबीसीएसई) माहितीनुसार ८७ सहभागी देशांतील ३८१ विद्यार्थ्यांमध्ये भारताने चीन, कझाकस्तान, रशिया, दक्षिण कोरिया आणि तैवान यांच्यासोबत संयुक्तपणे अव्वल स्थान मिळवले.

आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड ही माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जगातील अग्रगण्य स्पर्धांपैकी एक आहे. यामध्ये जगभरातील सर्वोत्तम कामगिरी करणारे विद्यार्थी सैद्धांतिक आणि प्रायोगिक भौतिकशास्त्रात




स्पर्धा करण्यासाठी एकत्र येतात. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (टीआयएफआर)चा एक भाग असलेल्या एचबीसीएसईनुसार आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमधील हा भारताचा २७वा सहभाग होता. गेल्या १० वर्षांत या स्पर्धेतील प्रत्येक भारतीय सहभागीने सुवर्ण किंवा रौप्यपदक मिळवले आहे.

### पदकविजेते भारतीय विद्यार्थी

*ज्या भारतीय विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड २०२६मध्ये सुवर्णपदक पटकाविले, त्यांच्यामध्ये कनिष्क जैन (पुणे, महाराष्ट्र), रिद्धेश अनंत बेंडाळे (इंदूर, मध्य प्रदेश), ऋषित गर्ग (द्वारका, नवी दिल्ली), श्रेष्ठ सुरैया (मुंबई, महाराष्ट्र), स्वरित जोशी (अहमदाबाद, गुजरात) यांचा समावेश आहे. भारतीय तुकडीचे नेतृत्व होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशनचे प्रा. अन्वेश मुझुमदार आणि सेंट झेवियर्स कॉलेज मुंबईच्या डॉ. लीना जोशी यांनी केले. आयआयएसईआर कोलकाता येथील प्रा.आनंदा दासगुप्ता आणि गोगटे–जोगळेकर महाविद्यालयाच्या निशा केळकर हे वैज्ञानिक निरीक्षक होते.*

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक म्हणजे राष्ट्रनिर्मिती -भाजप नेते अमित घाग

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस, संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच जय हनुमान स्पोर्ट्स क्लब वाशीचे अध्यक्ष कृष्णा गजानन बामणे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. वाशी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला शनिवार दि. (१८) रोजी सीसीटीव्ही कॅमेरे भेट देण्यात आले, तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यासोबतच वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

शाळेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध करून देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वह्या,



पेन व अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. बोरघर येथे परशुराम माने व त्यांच्या सहकाऱ्यांनीही कृष्णा बामणे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही करण्यात आला.

या कार्यक्रमास भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, भाजयुमो तालुकाध्यक्ष नरेश कोकरे, महिला मोर्चा अध्यक्षा रिया कासार, महामंत्री सायली बामणे, धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे, भाजयुमो सरचिटणीस ज्ञानेश्वर यादव,उपाध्यक्ष निलेश जंगम, किसान मोर्चा अध्यक्ष विकास बामणे, कामगार मोर्चा अध्यक्ष संदेश बामणे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाजपा तालुका अधक्ष अमित घाग यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक म्हणजे राष्ट्रनिर्मिती होय. विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणासाठी पुढाकार घेतल्यास भविष्यात सक्षम पिढी घडेल," असे मत भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी व्यक्त केले.

# ज्येष्ठ पंच हिरामण भोईर यांचा गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने दरवर्षी १५ जुलै हा कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांचा जन्मदिन 'कबड्डी दिन' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने कबड्डी आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विविध पुरस्कारांनी सन्मान करण्यात येतो. यावर्षी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पिंपळपाडा येथील राष्ट्रीय कबड्डी पंच हिरामण भोईर यांना कबड्डी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ पंच हा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.



या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार, माजी मंत्री तथा खासदार व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष गजानन कीर्तिकर, आमदार सर्वश्री भाई जगताप, किरणभैय्या सामंत, प्रमोद जठार, माजी आमदार दिनकर पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता केंद्रे, उपाध्यक्ष विलास चाळके, नगराध्यक्ष शिल्पा सुर्वे, उपाध्यक्ष शशिकांत गाडे, सहकार्यवाह माधव गायकवाड, खजिनदार मंगल पांडे, रत्नागिरी जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष मंगेश तांबे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि उदयोन्मुख खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय पंच श्री. भोईर यांनी कबड्डीच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांचा करण्यात आलेला सन्मान रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. याआधी त्यांना रायगड भूषण पुरस्कार, क्रीडा विभागाचा गुणवंत क्रीडा संघटक, अखिल आगरी संघातर्फे क्रीडा रत्न पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. नव्या पुरस्काराबद्दल राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह आस्वाद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्यवाह डॉ. चित्रा पाटील, सहकार्य जे.जे. पाटील, पंच मंडळाचे प्रमुख तथा आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, संजय म्हात्रे, सूर्यकांत ठाकूर, आशिष म्हात्रे, राष्ट्रीय खेळाडू संजय मोकल, राष्ट्रीय पंच गजानन मोकल, पांडुरंग पाटील, जनार्दन पाटील, मिलिंद पाटील व अन्य असोसिएशनचे पदाधिकारी तसेच पंच व क्रीडाप्रेमी, राजकीय, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मंडळींनी अभिनंदन केले.

# वरदा तटकरे संगीत व नृत्य अकॅडमीचे उद्घाटन



**रोहा : प्रतिनिधी**

डॉ मृदुला दाडे जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कलावंत घडावा यासाठी वरदाई चॅरीटेबल ट्रस्ट रोहा संचलित वरदा सुनील तटकरे संगित व नृत्य अकॅडेमी रोह्यात सुरू होत आहे.या अकॅडमी माध्यमातून नामवंत कलाकार तयार होतील असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले. वरदाई चॅरीटेबल ट्रस्ट रोहा संचलित वरदा सुनील तटकरे संगीत व नृत्य अकॅडेमी उद्घाटन प्रसंगी डॉ चिंतामणराव देशमुख सभागृह येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी ना.आदिती तटकरे, सौ.वरदा तटकरे, सुप्रसिद्ध गायिका वैशाली सामंत, अभिनेता पुष्कर श्रोत्री, ढोलकी वादक निलेश परब, सुप्रसिद्ध संबळ वादक विजय चव्हाण, जिप उपाध्यक्ष मधुकर पाटील, विजयराव मोरे, सभापती विजया पाशिलकर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, सुधाकर घारे, अशोक भोपतराव, विनोद पाशिलकर, समिर शेडगे, स्नेहल जगताप, सुभाष केकाणे, उमाताई मुंढे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अजित मोरे आदी उपस्थित होते.

खासदार सुनिल तटकरे म्हणाले , प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने घडत असतो. कला, संगीत, नृत्य क्षेत्रामध्ये खेड्यापाड्यांमध्येसुद्धा प्रचंड प्रमाणात गुणवत्ता आहे. कला, संगीत व नृत्य प्रशिक्षणासाठी मुंबई पुणे सारख्या ठिकाणी चांगल्या सुविधा आहेत.त्यामुळे त्या ठिकाणी चांगले कलावंत सहज रित्या तयार होतात.७१ वर्ष झाले तरी मी राजकारणाचा अभ्यास करतोय.प्रत्येक ठिकाणी अभ्यासाची चांगल्या प्रशिक्षणाची गरज आहे.राजकारणाच्या व्यतीरीक्त जग आहे. जीवन आहे.त्यामुळे आम्ही कबड्डी सह अन्य स्पर्धा घेतल्या.त्या खेळांच्या प्रेरणा घेत अनेक खेळाडू घडले. रायगड उपजात गुण असलेले अनेक कलावंत येथे घडावे.

यावेळी विजय चव्हाण यांनी खूप आनंद होतोय बोलताना की एक संगीताशी जोडलेली संगीत वाद्य, नृत्य, गायन या प्रकारची आधुनिक लेवलवरची अकॅडमी रोह्यासारख्या ठिकाणी होते आणि त्याचा सर्व श्रेय खा. सुनील तटकरे यांचे आहे. या संधीचा होतकरू मुला-मुलींनी आवश्य लाभ घ्या, असे आवाहन केले.

वैशाली सामंत यांनी आज वास्तुचा माझ्या हस्ते उद्घाटन होत आहे हा माझा मोठा सन्मान आहेच माझ्यासाठी मोठा आनंद आहे या वास्तुमध्ये कलेचा भांडार आहे. या वास्तुमधुन आमच्या इंडस्ट्रीमध्ये येणाऱ्या भविष्य काळामध्ये चांगले चांगले गुणी शिष्य स्वतःचा असा करिअर घडवतील ही मला खात्री आहे.रोहा मध्ये अशा अकॅडमीमुळे बरेच बऱ्याच आई-वडिलांचे स्वप्न आधी पूर्ण होणार आहेत.

यावेळी प्रास्ताविकात मंत्री आदिती तटकरे यांनी वरदाई चॅरीटेबल ट्रस्ट रोहा संचलित वरदा सुनील तटकरे संगित व नृत्य अकॅडेमी उद्घाटन कार्यक्रम होत असताना आम्हाला एक विलक्षण अभिमान व आनंद आहे, असे सांगितले.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**ई– निविदा सुचना**
**मलनि:स्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब–१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ SEWERAGE / / २०२६–२७ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "अ" "ब" "क" आणि "ड" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरीता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे. (२nd Call) | ५,४६,१७,२७७/– | ५,४७,०००/– | २३६०/– |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. २१७/२२९/२०२६
दिनांक :– २०/०७/२०२६

सही/–
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

# घरफोडी प्रकरणातील चौघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पारगाव शाखेतील सहाय्यक अभियंता अमित पाटोळे यांच्या कार्यक्षेत्रातील ३४ ट्रान्सफॉर्मरपैकी सात ट्रान्सफॉर्मरमधील साहित्य चोरी झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करताना पनवेल शहर पोलिसांनी सराईत आरोपीसह त्याच्या तीन साथीदारांना अटक करून एकूण सात गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.



पनवेल शहर पोलिसांची कारवाई; सात गुन्ह्यांची उकल

या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केला. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. यावेळी पोलीस नाईक सम्राट डांकी यांना खबऱ्याकडून सदर आरोपींची माहिती मिळाली. त्यानुसार अमर मुस्ताक अहमद, शिवम अमरनाथ शर्मा, गणेश मनोज शाहू आणि आलोक अजय गौतम यांना सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत पोउपनि दत्तात्रय देवकते, पोहेकॉ योगेश दिवेकर, पोना सम्राट डांकी, पोना अनिल चव्हाण, पोशि दत्ता जाधव, पोशि साईनाथ मोकल, पोशि विशाल दुधे आणि पोशि सचिन कोर यांनी सहभाग घेतला. अटक केलेल्या आरोपींकडे अधिक चौकशी सुरू असून, त्यांच्या विरोधात परिसरात आणखी गुन्हे दाखल आहेत का याचा तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत. तसेच चोरीला गेलेल्या मुद्देमालाचा शोध घेण्याचे कामही सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## टँकरमधून तेल चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईतील वाडीबंदर ते न्हावाशेवादरम्यान ड्रील ऑइलची वाहतूक करताना टँकरमधील तेलाची चोरी करणाऱ्या टोळीवर उलवे पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६८ लाख ७१ हजार ५०० रुपये किमतीचे ड्रील ऑइल आणि सहा टँकर जप्त केले आहेत. तसेच सहा टँकरचालक आणि तेल विकत घेणारा व्यापारी अशा एकूण सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वाहतूक व्यावसायिक सरफराज अहमद अफताब शेख (४७) यांना मुंबईतील वाडीबंदर ते न्हावा सप्लाय बेस येथे ड्रील ऑइल पोहोचविण्याचे काम मिळाले होते. त्यानुसार शेख यांनी सहा टँकरद्वारे न्हावा येथे हे तेल पोहोचविण्याची जबाबदारी चालकांवर सोपवली होती, मात्र सर्व चालकांनी संगनमत करून टँकरमधील ड्रील ऑइलची चोरी केली आणि ते मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमिन खान (५०) याला विकण्यास सुरुवात केली. याची माहिती मिळताच उलवे पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. याप्रकरणी पुढील तपास उलवे पोलीस करीत आहेत.

## खारघरच्या रथयात्रेचा लाकडी रथ घडवतोय पनवेलचा मुस्लिम कारागीर

**पनवेल : बातमीदार**

धर्म, जात आणि पंथ यापलीकडे जाऊन सामाजिक सलोखा, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे एक प्रेरणादायी उदाहरण खारघर येथे पाहायला मिळत आहे. खारघर येथे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या श्री जगन्नाथ रथयात्रेसाठी वापरला जाणारा भव्य लाकडी रथ गेल्या सलग २१ वर्षांपासून पनवेलचे प्रसिद्ध मुस्लिम कारागीर जनाब हनीफ कच्छी आणि त्यांची टीम अत्यंत कौशल्याने तयार करत आहेत.

रथयात्रेच्या दिवशी हा आकर्षक लाकडी रथ हजारो भाविकांच्या उपस्थितीत खारघरच्या रस्त्यांवरून मोठ्या उत्साहात मिरवला जातो. या सोहळ्यात सर्व धर्म आणि समाजातील नागरिक सहभागी होऊन सामाजिक ऐक्य, परस्पर आदर आणि बंधुभावाचा संदेश देतात.

## शेडुंगमध्ये ‘रोटरी’चा हरित उपक्रम
### ५०० रोपांच्या लागवडीने पर्यावरणाला हातभार




**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या वतीने शेडुंग येथे ५०० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात रोटेरियन्स, ॲन्स, ॲनेट्स, रोटरॅक्टर्स तसेच स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. वृक्षारोपणासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल वन विभागाचे आणि मोफत रोपे उपलब्ध करून दिल्याबद्दल महापौर नितीन पाटील यांचे क्लबच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

क्लबच्या अध्यक्ष डॉ. जयश्री पाटील यांनी यावेळी सांगितले की, झाडे लावणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून भावी पिढ्यांना निरोगी व समृद्ध पर्यावरण देण्याची आपली सामूहिक बांधिलकी आहे. आज लावलेले प्रत्येक रोप हरित भविष्यासाठी महत्त्वाचे ठरेल.

या उपक्रमात माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील, सचिव ॲड. हितेश राजपूत, पर्यावरण सेवा संचालक अली असगर व्होरा, प्रकल्प समन्वयक चारुदत्त भगत, आयपीपी निलेश पोटे, माजी अध्यक्ष राजेंद्र ठाकरे, चंद्रशेखर पन्हाळे, अध्यक्ष-निर्वाचित विनोद गुरमे, रोटरॅक्ट अध्यक्ष मनस्वी यांच्यासह डॉ. बाहुबली व कल्पना नागावकर, ॲड. दिपाली बोहरा, माधुरी श्रीनिवास कोडुरू, महेंद्र उरणकर, शुभदा भगत, सुनील बोराडे, मितेश फके, डॉ. गौरी शिवानी यांच्यासह अनेक रोटरी सभासद, ॲन्स, ॲनेट्स आणि लाईफलाईन हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी हाती कुदळ-फावडे घेऊन सहभाग नोंदविला.

## पाच लाख २८ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल** : एपीके फाईल डाऊनलोड करण्यास भाग पाडून पाच लाख २८ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गजेंद्र सिंग आणि इतर बँक खातेधारक यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुभाष तारे हे खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांना आरोपीने महानगर गॅसच्या कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवले आणि गॅस कनेक्शन बंद होईल, असे सांगून एपीके फाईल डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यामध्ये माहिती भरण्यास सांगून पाच लाख २८ हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यामध्ये वळती करून घेतले आणि तारे यांची फसवणूक केली. फसवणूक झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ड्रोन तंत्रज्ञानावर परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान विभाग, संगणकशास्त्र विभाग आणि विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २०) ड्रोन तंत्रज्ञान व त्याचा विविध क्षेत्रांतील उपयोग या विषयावर मार्गदर्शनपर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचा उद्देश विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाची मूलभूत माहिती, त्याची कार्यपद्धती तसेच विविध क्षेत्रांतील वाढते महत्त्व समजावून सांगणे हा होता.



कार्यक्रमात मान्यवर तज्ज्ञांनी मानवरहित हवाई वाहने, त्यांचे विविध घटक, कार्यप्रणाली, सुरक्षित वापरासाठी आवश्यक नियम तसेच ड्रोन क्षेत्रातील नव्या तांत्रिक घडामोडी यांची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमांमध्ये ड्रोन वेदा टेक्नॉलॉजी या कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी ड्रोन तंत्रज्ञानाचा कृषी, आरोग्य सेवा, आपत्ती व्यवस्थापन, संरक्षण, लॉजिस्टिक्स, देखरेख, हवाई छायाचित्रण आदी क्षेत्रांमध्ये होत असलेला प्रभावी वापर आणि या क्षेत्रातील वाढत्या रोजगार व करिअरच्या संधी यावर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. या परिसंवादात महाविद्यालयातील १४१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी संवादात्मक प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेत ड्रोन तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान आत्मसात केले. तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या संधींचा शोध घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या परिसंवादाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे तसेच सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. राजश्री म्हात्रे आणि प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. महेश धायगुडे, प्रा. सोनी पांडे, प्रा. निलम मोरे, प्रा. विवेक गरजे, प्रा. गीतांजली ठाकूर, प्रा. शिवानी सोनकर आणि प्रा. मृणाली आवळे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. शेवटी उत्स्फूर्त प्रश्नोत्तर सत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांसाठी हा परिसंवाद ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला असून उद्योगाभिमुख व भविष्यकालीन शिक्षण देण्याच्या संस्थेच्या प्रयत्नांना या उपक्रमामुळे अधिक बळ मिळाले.

## सफाई कामगाराचे घर फोडले

**पनवेल** : येथील पालिकेत कार्यरत एका सफाई कामगाराचे बंद घर फोडून चोरट्यांनी तब्बल आठ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना तळोजा येथे घडली आहे. या घरफोडीमुळे परिसरात नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संदीप पाटील हे तळोजा येथे राहण्यास असून पनवेल महापालिकेत सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. संदीप पाटील हे आपल्या घराला टाळे लावून रात्रपाळीला कामाला गेले होते.

## सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**नवीन पनवेल** : ४४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळून गेल्याप्रकरणी एका अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात रविवारी १९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिंधू गळवे ह्या सेक्टर २ कळंबोली येथे राहत असताना त्या एचपी गॅस डिलिव्हरी सेंटर, सेक्टर २, कळंबोली येथून पायी चालत जात असताना हा प्रकार घडला.

## रेस्टॉरंटवर पोलिसांचा छापा

**नवीन पनवेल** : कळंबोली येथील कॅप्टन ऑर्केस्ट्रा बार अँड रेस्टॉरंटवर गुन्हे शाखा कक्ष २ने छापा टाकत कारवाई केली. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात १९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला वेटर अंगविक्षेप करून बारमधील ग्राहकांशी बिभत्स हावभाव आणि अश्लील चाळे करताना दिसल्या. याप्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

## निसर्गाच्या सानिध्यात ‘कोमसाप’ची वर्षासहल

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यातील हिरवाई आणि साहित्यिकांच्या शब्दांचा संगम अनुभवण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखेची वर्षासहल पनवेलजवळील वाजापूर येथील पाटील फार्महाऊस येथे उत्साहात पार पडली. निसर्गरम्य वातावरणात आयोजित या सहलीला साहित्यप्रेमी सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वर्षासहलीला शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रीती महाजन, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव भरत पाटील, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. प्रीती महाजन यांनी यावेळी सांगितले की, साहित्यप्रेमींच्या स्नेहबंधांना अधिक दृढ करणारी आणि निसर्गाच्या सानिध्यात साहित्यिक अभिव्यक्तीला नवी ऊर्जा देणारी ही वर्षासहल सर्वांच्या स्मरणात राहील. भरत पाटील यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत निसर्गाच्या सानिध्यात होत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

याप्रसंगी शाखेच्या सदस्या चित्रलेखा जाधव यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सहलीची सुरुवात वृक्षारोपणाने करण्यात आली. त्यानंतर साहित्यिक व कवींचा परिचय, साहित्यविषयक संवाद, कवी संमेलन तसेच निसर्गभेट आणि गायन अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

## अवैध दारूविक्रीवर कडक कारवाई करणार
### राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवार यांचा इशारा

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात अवैध दारूविक्री आणि गावठी दारू विक्रेत्यांना आळा घालण्यासाठी नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवार यांनी कठोर पवित्रा घेतला आहे. पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी कुणाचीही गय केली जाणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.



छत्रपती संभाजीनगर येथे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर आदित्य पवार यांनी सॉफ्टवेअर इंजिनियरिंगचे शिक्षण घेतले. त्यांच्या मित्रपरिवाराचा कल शासकीय सेवेकडे असल्याचे पाहून त्यांनीही शासकीय सेवेचा मार्ग स्वीकारला. हिंगोली येथे कार्यरत असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली एका मोठ्या कारवाईत सुमारे १.६५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तसेच २३ ते २५ मे २०२६ या कालावधीत जिल्ह्याभरात अवैध दारूविक्री आणि दारू वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत त्यांच्या अधिकारी व कर्मचारी पथकाने औंढा तालुका परिसरात धाडसत्र राबवून २१ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९च्या कलमान्वये गुन्हे नोंदवले होते.

या कारवाईत गावठी दारूच्या भट्ट्या आणि अवैध दारूसाठी वापरण्यात येणारी वाहनेही जप्त करण्यात आल्याने अवैध दारू विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले होते. रायगड जिल्ह्याबाबत पत्रकारांशी बोलताना अधीक्षक पवार म्हणाले, "रायगड जिल्ह्यातील गावठी दारूच्या भट्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या जातील आणि संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच रायगड जिल्ह्यात अवैध दारू विक्री किंवा दमण-दिव येथून येणाऱ्या काही बार-रेस्टॉरंटमध्ये होणाऱ्या छुप्या विक्रीची माहिती प्राप्त होत आहे. त्यांच्यावर कठोर पावले उचलण्याच्या सूचना मी माझ्या अधिकारी वर्गाला दिल्या आहेत."

प्रशासकीय कामात पारदर्शकता बाळगून आपल्या अखत्यारीतील कामाचा आणि विविध तालुका कार्यालयांतील कामकाजाचा सातत्याने आढावा घेतला जाईल. व्यावसायिकांची कामे मार्गी लावून चांगल्या पद्धतीने काम करण्याचा माझा मानस आहे, असेही नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवार यांनी सांगितले.

# पनवेल सिटी इनरव्हीलच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा; स्नेहल कल्याणकर अध्यक्षपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी या सामाजिक संस्थेच्या २०२६-२७ या वार्षिक कार्यकाळासाठी अध्यक्षपदाची धुरा स्नेहल स्वप्नील कल्याणकर यांना रीतसर सोहळ्याच्या माध्यमातून सोपवण्यात आली. यावेळी इतर कार्यकारिणी सदस्यांनादेखील आपापल्या पदाची जबाबदारी देण्यात आली.

पनवेल येथील इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी या सामाजिक संस्थेचा पदग्रहण सोहळा नुकताच डिस्ट्रीक्ट ३१३ च्या माजी चेअरमन डॉ. शोभना पालेकर यांच्या प्रमुख उपास्थितीत दीपप्रज्वलन करून जगन्नाथ रथ यात्रेच्या शुभदिनी म्हणजेच १६ जुलै रोजी तथास्तु हॉल पनवेल येथे उत्साहात पार पडला. याप्रसंगी सन्माननीय अतिथी अर्चना परेश ठाकूर तसेच ममता प्रितम म्हात्रे यांच्या उपास्थितीने कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत झाली.

शुभांगी दिक्षीत यांनी गणेशवंदना प्रस्तुत करून कार्यक्रमाची सुरुवात केली. येणाऱ्या आषाढी एकादशीचे औचित्य साधून विठ्ठलनामाच्या भजनावर ताल धरून कार्यकरिणी सदस्यांनी आपला उत्साह प्रस्तुत केला. त्यानंतर क्लबच्या मावळत्या अध्यक्षा सिंपल आंचलिया यांनी स्वागतीय भाषणात उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून त्यांच्या २०२५-२६ या कार्यकाळात त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची माहिती पीपीटीच्या माध्यमातून सर्वांसमोर प्रस्तुत केली.

यात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सशक्तीकरण अशा विविध विभागांत त्यांनी केलेल्या एकूण ७६ प्रोजेक्ट्सची विस्तारित माहिती दिली. त्यांना क्लबसाठी वर्षभरात



केलेल्या कार्याची पोचपावती म्हणून डिस्ट्रीक्टकडून मिळालेल्या सन्मानपत्रांची तसेच पुरस्कारांची माहिती दिली व सर्वांचे आभार मानले.

नवीन अध्यक्षा स्नेहल कल्याणकर यांना शिष्टाचाराप्रमाणे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कॉलर व पीन प्रदान करून क्लबचा कार्यभार सोपविण्यात आला. त्याचबरोबर व्हाईस प्रेसिडेंट बिजल मिरानी, इमिडिएट पास्ट प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सेक्रेटरी विजयता कोठारी, खजिनदार ध्वनी तन्ना, आयएसओ गौरी देसाई, एडिटर प्रतिभा डांगी, क्लब करसपॉडन्स दुर्गा चौधरी, जॉइंट सेक्रेटरी अरुंधती बंडसोडे, ॲडवायझर हेतल बालड व कार्यकारिणी सदस्या तनिषा चेतवानी, सिमरन सचदेव, शुभांगी दिक्षीत या सर्वांना पीन देऊन पदग्रहण करवण्यात आले. नवीन मेंमबर्सचे क्लबमध्ये स्वागत करण्यात आले.

नवनिर्वाचित अध्यक्ष स्नेहल यांनी सभागृहाला उद्देशून आपल्या भावना तसेच भविष्यात समाजकार्यासाठी व क्लबच्या उन्नतीसाठी आखलेला आराखडा उपस्थितांसमोर मांडला. प्रमुख अध्यक्षा शोभना पालेकर यांनीदेखील मेंम्बर्सना क्लबच्या यशस्वी वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन करून शुभेच्छा व्यक्त केल्या. एडिटर प्रतिभा यांचे प्रथम बुलेटिन व सी.सी दुर्गा चौधरी यांच्या फेलोशिप डायरीचे अध्यक्षांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच एडिटर व आयएसोने क्लब मेम्बर्ससाठी घेतलेल्या प्रतियोगितांमध्ये यश मिळवलेल्या मेम्बर्सना पारितोषिक देऊन सम्मानीत करण्यात आले .

दरवर्षीप्रमाणे पेन येथील आई डे केअर या मतिमंद मुलांच्या संस्थेतील दोन मुलींच्या एका वर्षाच्या शिक्षणाची जबाबदारी स्नेहल व ध्वनी यांनी प्रत्येकी १५००० रुपये दानराशी देऊन उचलली. तसेच क्लबच्या सेक्रेटरी विजयता यांनीदेखील पनवेल येथील तक्का परिसरात स्थित स्वप्नालय या मुलींसाठी कार्यरत आश्रमातील एका मुलीस शिक्षणाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनविण्यासाठी सहा हजारांची दानराशी दिली. विविध २० प्रकारच्या फळझाडे व फुलझाडांच्या एकूण ५०० बियांचे आलेल्या पाहुण्यांना तसेच क्लबमधील सदस्यांना वाटप करण्यात आले जेणेकरून प्रत्येकाच्या हातून वृक्षारोपण होईल व त्याचा पर्यावरणाला लाभ होईल.

देशभरातील गौप्रेमींनी गौमातेला राष्ट्रमाता म्हणून दर्जा मिळावा यासाठी चालवलेल्या स्वाक्षरी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून त्यांना पाठिंबा दर्शविला तसेच गौमातेप्रति असलेली आस्था प्रकट केली . शेवटी बिजल मिरानी यांनी सर्व उपस्थित मान्यवर, क्लबचे सर्व सदस्य, पारिवारिक सदस्य यांचे आभार मानत जया मंगलनी यांचेदेखील सूत्रसंचालनाची जबाबदारी अत्यंत वेधक व उत्तमरित्या पार पाडल्याबदल आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


## संपादकीय

# हिंसेचे समर्थन अयोग्य

देशभरातील अनेक सुजाणांना सोमवारी आंदोलन, लोकशाही आणि कायद्याच्या राज्याविषयी प्रश्न पडले असतील. लोकशाही व्यवस्थेत सरकारविरोधात मुद्दे उपस्थित करण्याचा, टीका करण्याचा, निषेध नोंदवण्याचा आणि उत्तरदायित्वाची मागणी करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. मात्र या अधिकारांबरोबरच कायद्याचे पालन करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची नाही का?

**'नीट' या वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील गैरव्यवहार हा नक्कीच गंभीर विषय आहे. देशातील असंख्य विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा विषय असल्याने केंद्र सरकारने सुरुवातीलाच तत्परतेने या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवली. तपासादरम्यान कथित सूत्रधारांसह अनेक आरोपींना अटक करण्यात आली असून परीक्षेसंदर्भात कुठल्याही स्वरुपाची तडजोड करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू आहे. असे असताना गेले काही दिवस याच विषयावर सरकारला घेरण्याचा काही मंडळींचा खटाटोप सुरू आहे. त्याच कथित आंदोलनाचा भाग म्हणून सोमवारी राजधानी नवी दिल्लीत घडलेल्या घटनांकडे मात्र व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. दिल्लीत सोमवारी नीट पेपरफुटीप्रकरणी आंदोलकांनी मोठ्या संख्येने संसदेकडे मोर्चा काढला. अनेक ठिकाणी बॅरिकेड्स तोडण्याचे प्रयत्न झाले. आंदोलकांनी पोलिसांशी झटापट केली. या साऱ्यातून राजधानीतील कायदा-सुव्यवस्थेवर कमालीचा ताण आला. काही आंदोलकांकडून पोलिसांवरच केल्या गेलेल्या हल्ल्यांमुळे आंदोलनाच्या नैतिक भूमिकेलाही धक्का बसला. एकीकडे राजधानीत अराजकसदृश परिस्थिती निर्माण करण्याचे हे प्रयत्न सुरू असताना विरोधकांनी मात्र मोदी सरकारवरच जोरदार टीका केली. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना सरकारकडे चर्चेची मागणी करण्याची, कठोर प्रश्न विचारण्याची आणि राजकीयदृष्ट्या घेरण्याची संपूर्ण घटनात्मक संधी विरोधकांकडे उपलब्ध आहेच. अशा वेळी देशाच्या राजधानीतील व मुंबई-पुण्यासारख्या अन्य महानगरांतील रस्त्यांवर संघर्ष निर्माण करणे, पोलिसांशी झटापट करणे किंवा जनजीवन विस्कळीत करणे हे योग्य कसे म्हणता येईल? एका बाजूला काही आंदोलकांनी संघर्षाचा असा हिंसक मार्ग स्वीकारलेला असूनही दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारने मात्र संवादाचे दार बंद केले नाही. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी आंदोलकांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यांचे निवेदन स्वीकारले आणि मागण्यांवर चर्चा करण्याचे आश्वासन दिले. मतभेद असले तरी संवादाची प्रक्रिया सुरू ठेवणे हे लोकशाहीच्या परिपक्वतेचे लक्षण आहे. अशा संवाद आणि संसदीय चर्चा या दोन्ही मार्गांना संधी देण्याऐवजी संघर्षाचे वातावरण निर्माण करणे कोणाच्याही हिताचे नाही. अलीकडच्या काळात भारताच्या काही शेजारी देशांनी राजकीय अस्थिरता, रस्त्यावरचे संघर्ष आणि संस्थांवरील अविश्वास यांची मोठी किंमत मोजली आहे. अशा पार्श्वभूमीवर भारतातही सतत तणाव, अस्थिरता आणि संघर्षाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींविषयी देशातील जनतेने सावध राहिले पाहिजे. सरकारवर टीका करणे हा लोकशाहीचा भाग आहे. परंतु लोकशाही संस्थांविषयीच अविश्वास निर्माण करणे किंवा हिंसेचे समर्थन करणे हा मार्ग देशाच्या हिताचा कदापि असू शकत नाही. सरकारने सर्व परीक्षाप्रणाली तांत्रिकदृष्ट्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि अधिक पारदर्शक करण्यासाठी आवश्यक सुधारणा वेगाने राबवणे गरजेचे आहेच. त्याचवेळी लोकशाहीची ताकद संसद, न्यायव्यवस्था आणि संवाद यांमध्ये आहे. रस्त्यावरील हिंसेमध्ये नाही, हे देशातील तरुणांनी व विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. भारताची लोकशाही मतभेदांना अवश्य स्वीकारते. मात्र हिंसेचा स्वीकार व समर्थन होऊ शकत नाही. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी संवाद, उत्तरदायित्व आणि सुधारणा हेच योग्य मार्ग आहेत.**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष सर्वसामान्यांचा आधार





मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबंधीत रुग्णालयामार्फत अर्थिक सहाय्य देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात सदर अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याने नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि.०१ मे २०२५ रोजी औपचारिक उद्घाटन करुन सुरु करण्यात आलेला आहे. यामुळे राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक जिल्हयातच जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सहज उपलब्ध, संलग्न रुग्णालयाची यादी, अर्ज आणि पाठपुराव्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही तसेच अर्ज स्विकृती व सध्यस्थिती इत्यादी मदत पुरवली जाणार आहे.

**मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष रायगड जिल्ह्यातील रुग्णालयांची नावे.**

१) आधार मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू, जुने पनवेल,७ अ, पहिला मजला, गुरुकृपानगर कॉम्प्लेक्स, पनवेल. २) आदित्य नर्सिंग होम, महाड, रायगड,दस्तुरी नाका, रायगड रोड, महाड, जि. रायगड. ३) अक्का हॉस्पिटल प्रा. लि. रायगड, ९९९ बाळ सावंत एसएमएस पेट्रोल पंपासमोर, ४) अलिमा डायलिसिस सेंटर रायगड,गणपतीबप्पा बिल्डिंग, कल्याण नाका, पनवेल. ५) भांडारकर चिल्ड्रन्स क्लिनिक न्यू पनवेल,मधुर मिलन बिल्डिंग, पहिला मजला, सेक्टर ५पनवेल. ६) बिस्मिल्ला हॉस्पिटल पनवेल,पद्मा नगर, पनवेल. ७) चिरायु चिल्ड्रन्स हॉस्पिटल न्यू पनवेल, शुभारंभ बिल्डिंग, पनवेल. ८) डॉक्टर हॉस्पिटल पनवेल रायगड, पनवेल, रायगड, ९) डॉ. ए. ए. देशमुख हेल्थ फाउंडेशन रायगडख महाड, रायगड. १०) डॉ. मोहितेस अयुम मेडिकल फाउंडेशन न्यू पनवेल,सेक्टर १६, शिवाजी मार्ग, अश्विनीनगर न्यू पनवेल, नवी मुंबई, ११) डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय पनवेल,१९६/१, पनवेल, १२) डॉ. पुष्पक शिंदे हॉस्पिटल, रायगड, मोहोत ऑर्टिक गली, न्यू नार्गार्द, पालिका बिल्डिंग, १३) जिजामाता हॉस्पिटल उरण रायगड, यू उपाशी खारफाटा, ता.उरण, रायगड. १४) श्रावणी ब्रेन अँड स्पाईन सेंटर आणि ऑर्थो पीडिक हॉस्पिटल अणुसया पनवेल,अणुसया हॉस्पिटलजवळ, पनवेल, १५) लाईफ केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अँड आयसीयू पनवेल अशोक नगर, प्लॉट क्र. ३, खांदा कॉलनी, रायगड. १६) लाईफलाईन हॉस्पिटल मेडिकल अँड रिसर्च सेंटर पनवेल रायगड,सी ४, साई नेशनल हायवे चार, नवीन पनवेल रायगड. १७) माधवबाबा आयुर्वेद कार्डिअक रिहॅब सेंटर, रायगड, १७१८/८४, से. ८ वॉर्ड, सारथी मेडिकल, खोपोली. १८) मेहर मॅटरनिटी हॉस्पिटल माणगाव मोरबा रोड माणगाव रायगड. १९) मंगला नर्सिंग होम आणि कॅन्सर हॉस्पिटल, रायगड, मु. उंबके फाटा, ता. पेण, जि. रायगड. २०) मनिराज ईएफसी हॉस्पिटल, न्यू पनवेल,शॉप नं. १६/२, निकुंज सदन, सेक्टर १०, खांदा कॉलनी, न्यू पनवेल. २१) मातोश्री मल्टिस्पेशालिटी पनवेल,प्लॉट क्र २८ बी, शिवाजी सेक्टर ३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल. २३ मनेषा ऑक्सिजन हॉस्पिटल, रायगड,कोसा-मुळा, रायगड, २४) निकम परमार हॉस्पिटल अँड इन्स्टिट्यूट केअर युनिट रायगड.ए विंग गुल अपार्टमेंट, न्यू उरण रोड, पंचवटी हॉटेल जवळ, पनवेल रायगड. २५) निरामय हॉस्पिटल जुने पनवेल रायगड.प्लॉट नं. २१, अठ्ठावीस मिडल क्लास सोसायटी रोड, शिवाजी चौक, जुने पनवेल, रायगड. २६) निरामय हॉस्पिटल पेण खोपोली रायगड शंकर नगर, कोबंडपाडा, पेण खोपोली रोड, रायगड. २७) पाडळकर हॉस्पिटल अँड सीआययू नवी पनवेल,एक्सेल पाम ग्रीन इन्क्लेव्ह बिल्डिंग, प्लॉट नं. १, सेक्टर १, खांदा कॉलनी, नवी पनवेल. २८) प्राचिन हेल्थकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल रायगड,प्लॉट नं. १०७, दोन हॉटेल गार्डनच्या मागे, पनवेल, रायगड. २९) प्राचिन हेल्थकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, पनवेल,प्लॉट नं. ६९/२, हॉटेल गार्डन जवळ, पनवेल. ३०) पुरोहित क्लिनिक पनवेल,प्लॉट नं. १००, साई सोसायटी, पनवेल, रायगड. ३१) आर एस एस जनकल्याण समिती, रायगड, ३२) सेलार हॉस्पिटल अँड आयसीयू,तुळशी प्रेमा सीएचएस, खांदा कॉलनी, नवी मुंबई, ३३) सुखम हॉस्पिटल पनवेल,जसबंदवाला कॉम्प्लेक्स, विष्णुजी नाका, जुने पनवेल, ३४) सुमितराज हॉस्पिटल खोपोली रायगड,शांतीनगर, खोपोली, रायगड, ३५) सुपाकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, रायगड,पहिला मजला, सत्य सिपिएस लि., सेक्टर २ ई, कळंबोली, रायगड, ३६) उत्रती हॉस्पिटल अँड आयसीयू पनवेल रायगड,जे. के. प्लाझा, शिवाजी चौक, पनवेल,३७) वीर हॉस्पिटल अँड आयसीयू न्यू पनवेल,नील अनंतेवळा इमारत, दुसरा मजला, सेक्टर १७, खांदा कॉलनी, न्यू पनवेल पश्चिम.

**-संकलन जिल्हा माहिती कार्यालय, रायगड, अलिबाग**

# स्क्रीनपलीकडचा सोबती




एकेकाळी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे विज्ञानकथेतील कल्पना वाटायची. आज ती आपल्या खिशातल्या मोबाईलमध्ये, घरातल्या टीव्हीमध्ये आणि ऑफिसच्या लॅपटॉपमध्ये शांतपणे वावरत आहे. सकाळी उठल्यावर आपण जे पहिले गाणे ऐकतो, ते आपल्या आवडीचे का असते? आपण टाईप करायला सुरुवात करताच पुढचा शब्द मोबाईल कसा ओळखतो? हा चमत्कार नाही, तर आपल्या सवयींमधून शिकलेल्या तंत्रज्ञानाचा तो परिणाम आहे.

या तंत्रज्ञानाने सर्वात मोठा बदल घडवला आहे तो भाषेच्या क्षेत्रात. आज मराठीत विचारलेला प्रश्न इंग्रजीत भाषांतरित होऊन त्याचे उत्तर पुन्हा मराठीत मिळणे, हे सहज शक्य झाले आहे.

यामुळे ज्ञानाची दारे खऱ्या अर्थाने सर्वांसाठी उघडली गेली आहेत. एखाद्या शेतकऱ्याला पिकावरील रोगाची माहिती हवी असेल, तर तो फक्त फोटो काढून माहिती मिळवू शकतो. विद्यार्थ्याला एखादा कठीण विषय समजावून घ्यायचा असेल, तर त्याला आता एक वैयक्तिक शिक्षक मिळाला आहे जो कधीच कंटाळत नाही.

आरोग्याच्या क्षेत्रातही हा बदल लक्षणीय आहे. स्मार्ट घड्याळ आपल्या हृदयाचे ठोके मोजते, झोपेचा दर्जा सांगते आणि वेळीच सावध करते. ही माहिती डॉक्टरांना अधिक अचूक निदान करण्यास मदत करत आहे. तंत्रज्ञान माणसाची जागा घेत नाही, तर माणसाला अधिक सक्षम बनवत आहे, हे यातून दिसते. अर्थात, प्रत्येक नव्या तंत्रज्ञानासोबत काही प्रश्न येतातच. आपण त्यावर किती अवलंबून राहावे, आपली वैयक्तिक माहिती किती द्यावी, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. पण याचे उत्तर तंत्रज्ञानाला नाकारण्यात नाही, तर ते अधिक समजून घेऊन वापरण्यात आहे.

चाकाचा शोध लागला तेव्हा माणूस आळशी होईल अशी भीती होती, पण चाकाने माणसाला अधिक वेगाने धावायला शिकवले.

आज गरज आहे ती डिजिटल साक्षरतेची. कृत्रिम बुद्धिमत्तेला घाबरण्याऐवजी तिला एक कुशल सहकारी मानले पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टफोन तुमची प्रत्येक गोष्ट ऐकतोय!

कल्पना करा, तुम्ही तुमच्या मित्रासोबत बसून एसी, फ्रिज किंवा ब्रँडेड कपडे खरेदी करण्याबद्दल बोलत आहात. लवकरच, तुमच्या स्मार्टफोनवर या गोष्टींच्या जाहिराती दिसू लागतात. तुम्हाला आश्चर्य वाटते, तुम्ही कोणतीही वेबसाइट शोधली नाही किंवा भेट दिली नाही, मग अचानक या जाहिराती कशा दिसू लागल्या?खरंतर याचे उत्तर तुमच्या स्मार्टफोनमध्येच दडलेले आहे. स्मार्टफोन फक्त तुमचा स्पर्शच ऐकत नाही तर तुमचा आवाज देखील ऐकतो.



जोपर्यंत त्याचा गैरवापर होत नाही, तोपर्यंत ते सामान्य वाटते. पण जर तुमचे वैयक्तिक संभाषण देखील रेकॉर्ड होऊ लागले, तर ते तुमच्या गोपनीयतेसाठी मोठा धोका बनू शकते. म्हणून, स्मार्टफोनच्या त्या सेटिंग्ज ओळखणे आणि त्या वेळीच बंद करणे महत्वाचे आहे. यामुळे तुमची गोपनीयता अबाधित राहील आणि तुम्ही अवांछित जाहिराती टाळू शकाल.

स्मार्टफोन तुमचे संभाषण नेहमीच ऐकत नाही. हो, जर तुम्ही एखाद्या ॲपला मायक्रोफोन परवानगी दिली असेल. किंवा 'हे सिरी', 'ओके गुगल' सारखे व्हॉइस असिस्टंट फोनमध्ये चालू असतात. ही वैशिष्ट्ये पार्श्वभूमीत काही सेकंदांसाठी आवाज ऐकतात, परंतु जेव्हा कमांड ट्रिगर केली जाते तेव्हाच सक्रिय होतात.आपला स्मार्टफोन आणि इतर डिजिटल उपकरणे वापरकर्त्याचा अनुभव सुधारण्यासाठी आणि जाहिराती अधिक संबंधित बनवण्यासाठी अनेक प्रकारचा डेटा गोळा करतात.

एखादे ॲप आपले संभाषण ऐकत आहे की नाही हे आपण कसे ओळखू शकतो?

सर्वप्रथम, तुम्ही वापरत असलेल्या ॲपची मायक्रोफोन परवानगी तपासा. बहुतेक स्मार्टफोन ॲप्स इन्स्टॉलेशनच्या वेळी मायक्रोफोन ॲक्सेस करण्याची परवानगी मागतात, त्यावेळी घाईघाईत आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि त्याला परवानगी देतो. म्हणून, ॲप्सचे गोपनीयता धोरण वाचले पाहिजे कारण त्यात ॲप तुमचा डेटा कसा वापरू शकते हे सांगितले आहे. काही ॲप्स असा पर्याय देखील देतात की तुम्ही तुमचा आवाज रेकॉर्ड करणे थांबवू शकता. जर तुम्ही मायक्रोफोन ॲक्सेसला परवानगी दिली असेल तर तांत्रिकदृष्ट्या ॲप नियमांमध्ये आहे. परंतु जर रेकॉर्डिंग परवानगीशिवाय होत असेल तर ते कायद्याचे उल्लंघन आहे.

# प्रतिभावान गीतकार आनंद बक्षी



## निमित्त

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.

कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते, मात्र त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी.

शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणार्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले.

या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महीना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), सावन के झूले पडे (जुर्माना), दम मारो दम (हरे राम) ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी.

कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पेरूमुळे रक्तातील साखर ठेवता येते नियंत्रित

फळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असे पोषण प्रदान करतात. परंतु तज्ज्ञांच्या मते, फळांच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. पेरूच्या पानांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे जास्त पोषक घटक असतात. दिल्लीतील सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंगला यांनी पेरू, पेरूपासून तयार केलेली चाट आणि पेरूच्या पानांचे रक्तातील साखरेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती दिली.



पेरूचा ग्लायसेमिक इंडेक्स तुलनेने कमी असतो, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी तो एक चांगला पर्याय आहे.परंतु, अर्ध्याहून अधिक पिकलेले पेरू जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, असे डॉ. सिंगला म्हणाले.

पेरू चाट : कमीत कमी साखर आणि मसाल्यांचा वापर करून बनवल्यास पेरू चाट हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. पेरूला जास्त मीठ, साखर किंवा मसाले लावून खाल्ल्याने त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात, असे डॉ. सिंगला म्हणाले.

**पेरूची पाने**

डॉ. सिंगला यांच्या मते, पेरूच्या पानांचा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कारण- ते आतड्यांमध्ये शोषल्या जाणाऱ्या ग्लुकोजला रोखू शकतात आणि इन्सुलिन उत्पादनास उत्तेजन देऊ शकतात. तुम्ही पेरूच्या पानांचे सेवन चहा किंवा अर्काच्या स्वरूपात करू शकता.

**रक्तातील साखर कमी करते**

प्राणी आणि मानवी अभ्यासात पेरूची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करतात, असे आढळून आले आहे.

इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते : पेरूची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे टाईप २ मधुमेह होण्याचा धोका कमी होतो.अँटिऑक्सिडंट गुणधर्म : पेरूची पाने अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात.सावधगिरी बाळगा

पेरूच्या सेवनामुळे तुमच्या रक्तशर्करेच्या पातळीवर प्रतिकूल परिणाम होत नाही ना याची खात्री करण्यासाठी तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासा.

# दांडफाटा रिक्षा स्टँडजवळील शौचालयाची घाण रस्त्यावर; नागरिकांच्या आरोग्याला धोका

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-दांड तसेच मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर असणाऱ्या दांडफाटा थांब्यावर नागरिकांच्या सोयीसाठी शौचालय उभारण्यात आले आहे. या शौचालयाचे घाण पाणी रस्त्यावर येत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

समोरच असलेला रिक्षाथांबा, ये-जा करणारे प्रवासी या दुर्गंधीने त्रस्त असून आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

येथून शाळकरी विद्यार्थी, महिला, कामगार आणि प्रवाशांना दररोज जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे. साचलेल्या या घाण पाण्यामुळे परिसरात साथीचे आजार पसरल्यास त्याला जबाबदार कोण?

तीन दिवसांत रस्त्यावर येणारे शौचालयाचे पाणी पूर्णपणे बंद न झाल्यास ड्रेनेज लाईन आणि तुंबलेले पाणी त्वरित साफ न केल्यास परिसरातील सर्व नागरिक, महिला आणि रिक्षा चालक बांधव प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.



# सीसीटीव्हीच्या मदतीने ३६ तासांत दुचाकी चोरीचा छडा

**रेवदंडा :** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खानाव (ता. अलिबाग) येथून चोरीस गेलेली दुचाकी अवघ्या ३६ तासांत शोधून काढत पोलिसांनी ओडिशातील आरोपीला अटक केली असून चोरीस गेलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

खानाव येथील जितेश भास्कर पाटील (वय ३३) यांनी दि. १६ जुलै रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांची टीव्हीएस स्कूटी (क्रमांक MH-०६-CS-८७४५) ही घराच्या अंगणात उभी केली होती. मात्र, दि. १७ जुलै रोजी पहाटे अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे यांनी या गुन्ह्याची गांभीर्याने दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंगाज यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती केली.

## महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष १२, अंक ५३] गुरुवार, जुलै ९, २०२६/आषाढ १८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक ७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/ सी आर/२९/२०२१.- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस/११/२०१४/ सी आर / ७७ / अ२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यास यापुढे "सदर अधिसूचना" असे संबोधले जाईल) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ३ पोट-कलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ (झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल।

त्याअर्थी, सदर अधिसूचना अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांनी यापूर्वी अधिसूचना क्र. भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/सी आर-२९/२०२१, दि. ०७/०७/२०२३ अन्वये कलम ११ ची अधिसूचना व अधिसूचना क्र. भूसंपादन/टे-८/कळंबुसरे/एसआर २९/२०२१/२०२६, दि. १४ मे २०२६ अन्वये कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उपरोक्त अधिसूचनेतील जमीन चिरनेर, आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी आवश्यक असलेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी त्यांचेकडील पत्र क्र.सां.बा.वि. पनवेल/रेशा/कळंबुसरे बाह्यवळण/२५१७, दि.०१/०७/२०२६ अन्वये कळविण्यात आली आहे. त्यामुळे परिशिष्ट १ मध्ये नमूद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी, सदर कायद्याचा कलम ११ उप-कलम (१) अन्वये अधिसूचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते;

त्याअर्थी, परिशिष्ट - ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. आणि त्याअर्थी, परिशिष्ट- ४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे;

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उप कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे; त्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणताही व्यवहार हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही:

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उप कलम (५) व भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १० उप नियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भुमि अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल;

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उप कलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन असल्याने उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांच्या वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट - १**

गावाचे नाव :- कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड

| अ.क्र. | स.नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | ३८/३ ई | ०-०३-४२ |
| २ | ३८/६ पै | ०-००-०९ |
| ३ | १३/६ पै | ०-००-४० |
| ४ | ३/३ पै | ०-००-८८ |
| ५ | ३/४ पै | ०-००-४९ |
| ६ | ३/५ पै | ०-००-०१ |
| ७ | ४ पै | ०-००-८२ |
| | एकूण | ०-०६-११ |

**परिशिष्ट - २**

**प्रकल्पाचे नाव :-** मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ने १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**प्रकल्पाचे विवरण :-** मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र. १/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे :-** मौजे कळंबुसरे, ता. उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र. १/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये-जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट - ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

**परिशिष्ट - ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा** : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ, दि. १३ जून २०२३ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

**परिशिष्ट - ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

नोट. - प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**उरण,**
**दिनांक ९ जुलै २०२६.**

**सही/-**
**आविशकुमार सोनोने,**
**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**मेट्रो सेंटर क्र. १, उरण.**

**जिमाका/ रायगड/जाहिरात/७२/२०२६**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व नियम १६(३) अन्वये संस्थाचे एकत्रिकरण/त्याची मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे ज्यांच्या हित संबंधाना बाधा येईल अशा सदस्यांना, धनकोंना व इतर व्यक्तींना द्यावयाची जाहीर नोटीस. गोकर्ण को.हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म., पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल यांची नोंदणी रद्द करणेबाबत सदर संस्थेचे आज नोंदणी निबंधक हे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनेवल ता. पनवेल, जि. रायगड हे असून त्यांचा पत्ता कृषि उत्पन्न बाजार समिती आवार ए विंग, पहिला मजला, सहकार नगर, पनवेल, पिन ४१०२०६ असा आहे गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थांकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ पोट कलम (जे) च्या परंतु काचेंर्ची खंड (ओ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य,धनको आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती यास नोटीस देण्यात येत की, निबंधकांची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या रविवार दि. ३०/०६/२०२६ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत एकत्रिकरणाच्या प्रारंभिक ठराव मंजूर करण्यात आल्यानंतर संस्थेने "गोकर्ण को. हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे एकत्रिकरण करण्याचे, आपली मालमत्ता व जबाबदाऱ्या "विघ्नहर्ता को.हौ.सो.म., पनवेल या संस्थेमध्ये एकत्रितरित्या हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. एकत्रिकरण करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत पुढील गोष्टी लागू असतील. अ) गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, ब) आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल, क) श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे 'विघ्नहर्ता को.हौ.सो. म. पनवेल या संस्थेकडे वर्ग होतील व भागभांडवल, प्रवेश फी, सिकिंग फंड, राखीव निधी, ठेव इत्यादी बाबी व तीनही संस्थाचे ताळेबंद एकत्र केल्याप्रमाणे राहतील, नियोजित एकत्रिकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे जिच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत, संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती आल्यास त्या पाठविण्यात आणि एकत्रिकरण केलेल्या संस्थेतील आपले सदसत्व चालू ठेवण्याचा/आपल्या शेअरची, हितसंबंधाची किंवा येणे असलेल्या रक्कमेची मागणी करण्याचा अधिकार आहे. एक महिन्याच्या आंत (नोटीस प्रसिध्द झाल्यापासून) कोणतीही हरकत आली नाही तर हितसंबंधी व्यक्तीची त्या निर्णयास मान्यता आहे असे समजण्यात येईल.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक - २०/०७/२०२६**

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| अध्यक्ष | चेअरमन | खजिनदार |

**आकांक्षा को.ऑप. हौ.सो.म., पनवेल**

**पटेल पार्क बिल्डींग नं १ परदेशी आळी, पनवेल , जि. रायगड ४१०२०६**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व नियम १६ (३) अन्वये संस्थाचे एकत्रिकरण/त्याची मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे ज्यांच्या हित संबंधाना बाधा येईल अशा सदस्यांना, धनकोंना व इतर व्यक्तींना द्यावयाची जाहीर नोटीस. गोकर्ण को.हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म., पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल यांची नोंदणी रद्द करणेबाबत सदर संस्थेचे आज नोंदणी निबंधक हे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनेवल ता. पनवेल, जि. रायगड हे असून त्यांचा पत्ता कृषि उत्पन्न बाजार समिती आवार ए विंग, पहिला मजला, सहकार नगर, पनवेल, पिन ४१०२०६ असा आहे गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थांकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ पोटकलम (जे) च्या परंतु काचेंर्चा खंड (ओ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य, धनको आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती यास नोटीस देण्यात येत की,निबंधकांची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या रविवार दि.३०/०६/२६ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत एकत्रिकरणाच्या प्रारंभिक ठराव मंजूर करण्यात आल्यानंतर संस्थेने "गोकर्ण को. हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे एकत्रिकरण करण्याचे, आपली मालमत्ता व जबाबदाऱ्या ''विघ्नहर्ता को.हौ. सो.म., पनवेल या संस्थेमध्ये एकत्रितरित्या हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. एकत्रिकरण करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत पुढील गोष्टी लागू असतील. अ) गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, ब) आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल, क) श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे 'विघ्नहर्ता को.हौ.सो. म. पनवेल या संस्थेकडे वर्ग होतील व भागभांडवल, प्रवेश फी, सिकिंग फंड, राखीव निधी, ठेव इत्यादी बाबी व तीनही संस्थाचे ताळेबंद एकत्र केल्याप्रमाणे राहतील, नियोजित एकत्रिकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे जिच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत, संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती आल्यास त्या पाठविण्यात आणि एकत्रिकरण केलेल्या संस्थेतील आपले सदसत्व चालू ठेवण्याचा/आपल्या शेअरची, हितसंबंधाची किंवा येणे असलेल्या रक्कमेची मागणी करण्याचा अधिकार आहे. एक महिन्याच्या आंत (नोटीस प्रसिध्द झाल्यापासून) कोणतीही हरकत आली नाही तर हितसंबंधी व्यक्तीची त्या निर्णयास मान्यता आहे असे समजण्यात येईल.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक - २०/०७/२०२६**

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| अध्यक्ष | चेअरमन | खजिनदार |

**श्रीपूजा को.ऑप. हौ.सो.म., पनवेल**

**पटेल पार्क बिल्डींग नं २ व ३ परदेशी आळी, पनवेल , जि. रायगड ४१०२०६**

## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन-४०२१०७**

Email: elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website: www.mahapwd.gov.in

दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा-१/ १९४० / सन २०२६** | **दिनांक: १५.०७.२०२६**

**ई-निविदा सुचना क्र. ०८ सन २०२६-२७**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८** हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग /इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| **प्रथम मागणी** | | | | | |
| 01 | **RAESD/CR/6231/2026-27,** Providing Fully comprehensive maintenance 16 Passenger (Gr-3 Floor) 2 Nos at Administrative Building Panvel Tal: Panvel Dist: Raigad. (for 3 years) | ९,६८,६६४/- | दिनांक २२.०७.२०२६ सकाळी १०:०० ते दिनांक; २९.०७.२०२६ सायंकाळी १८:०० | १) निविदापुर्व बैठक नाही. 2) निविदेमधील लिफाफा क्र.1 मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी. 3) इसारा रक्कम रु. 10000/- 4) निविदा शुल्क रु. 590/- | दिनांक ३१.०७.२०२६ सकाळी ११:०० |
| 02 | **RAESD/CR/6229/2026-27,** Providing Semi Compresensive Quarterly Annual Maintenance Contract for 2 nos 250 kVA.1 nos 125VA, DG set at Sub-district Hospital Panvel, Administrative Building Panvel Dist. Raigad. (For 3 years) | १०,२९,२७६/- | दिनांक २२.०७.२०२६ सकाळी १०:०० ते दिनांक; २९.०७.२०२६ सायंकाळी १८:०० | 1) निविदापुर्व बैठक नाही. 2) निविदेमधील लिफाफा क्र.1 मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी. 3) इसारा रक्कम रु. 11000/- 4) निविदा शुल्क रु. 590/- | दिनांक ३१.०७.२०२६ सकाळी ११:०० |
| 03 | **RAESD/CR/6228/2026-27,** Providing Semi Compresensive Quarterly Annual Maintenace Contract for 1 nos 100 KVA, 4 nos 30KVA, DG set at Sub-dostrict Hospital Karjat, Rural Hospital Chowk, Rural Hospital Kashele Dist-Raigad. (for 3 years) | ११,६३,२६८/- | दिनांक २२.०७.२०२६ सकाळी १०:०० ते दिनांक; २९.०७.२०२६ सायंकाळी १८:०० | 1) निविदापुर्व बैठक नाही. 2) निविदेमधील लिफाफा क्र.1 मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी. 3) इसारा रक्कम रु. 12000/- 4) निविदा शुल्क रु. 590/- | दिनांक ३१.०७.२०२६ सकाळी ११:०० |
| 04 | **RAESD/CR/6227/2026-27** Providing Semi Compresensive Quarterly Annual Maintenance Contract for 1 nos 100 kVA, 1 nos 62.5 KVA. 1 nos 60KVA, 1 nos 30KVA, 1 nos 25 KVA, 7.5 KVA DG set at Sub-district Hospital Pen, EVM VVPAT Gowdown and Rural Hospital Uran Dist. Raigad. (For 3 years) | १४,६८,२४८/- | दिनांक २२.०७.२०२६ सकाळी १०:०० ते दिनांक; २९.०७.२०२६ सायंकाळी १८:०० | 1) निविदापुर्व बैठक नाही. 2) निविदेमधील लिफाफा क्र.1 मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी. 3) इसारा रक्कम रु. 15000/- 4) निविदा शुल्क रु. 590/- | दिनांक ३१.०७.२०२६ सकाळी ११:०० |
| 05 | **RSD/OW/5454/2026-27** Providing Solar Highmast (5nos) in premices of Mirkarwada Jetty Ratnagiri, Tal-Dist-Ratnagiri. | १०,६६,८४५/- | दिनांक २२.०७.२०२६ सकाळी १०:०० त दिनांक; २९.०७.२०२६ सायंकाळी १८:०० | 1) निविदापुर्व बैठक नाही. 2) निविदेमधील लिफाफा क्र.1 मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी. 3) इसारा रक्कम रु. 11000/- 4) निविदा शुल्क रु. 590/- | दिनांक ३१.०७.२०२६ सकाळी ११:०० |

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.। मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**विमाका/ कोवी/व. जा. /५९ /४००८**
**दिनांक : २०/०७/२०२७**

**सही/**
**(अ.म. पुराणिक)**
**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां. पेण-रायगड**

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि ज्येष्ठांना छत्रीवाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त "समाजसेवा हाच सर्वोत्तम उत्सव" या संकल्पनेतून श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था आणि गौरव सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोमवारी (दि. २०) सीबीडी येथील सुनील गावसकर मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात आर्थिकदृष्ट्या गरजू, हुशार आणि अनाथ आश्रम शाळेतील २,००० विद्यार्थ्यांना मोफत वह्या, शालेय गणवेश आणि दप्तरांचे वाटप करण्यात आले. तसेच ९०० ज्येष्ठ नागरिक आणि स्वच्छता दूत यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. यावेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विकास आणि जनकल्याणाची अनेक कामे होत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी उपयुक्त ठरणारे उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी वाढदिवसाची भेट आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सक्षम व्हावे, गरजू कुटुंबांना मदत मिळावी आणि ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व्हावा या उद्देशाने हा सेवा उपक्रम आयोजित केला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य पुढेही सातत्याने सुरू राहील. भाजप नेते निलेश म्हात्रे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाची नवी दिशा प्राप्त केली आहे. समाजहिताचे उपक्रम राबविणे हीच भारतीय जनता पक्षाची कार्यसंस्कृती आहे.कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न आहे की प्रत्येकाला शिक्षण मिळाले पाहिजे, कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे गौरव सेवा ट्रस्टच्या आयोजकांनी सांगितले.

समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकास आणि सेवाभावाची भावना पोहोचावी, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे तसेच ज्येष्ठ नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी या उदात्त उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी व्यासपीठावर भाजप नेते निलेश म्हात्रे, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, सीबीडी गुरुद्वाराचे प्रमुख जसपाल सिंह सिद्धू, भाजप प्रवक्ते पंकज मोदी, माजी नगरसेवक अशोक गुरखे यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य सेवा उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वच्छतेचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे येथे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती करणारा एक आगळावेगळा सोहळा संपन्न झाला. हेंकेल या कंपनीतर्फे विद्यार्थ्यांना ओला कचरा व सुका कचरा साठवण्यासाठी स्वतंत्र कचरापेटी अर्थात वेस्टबिनचे वाटप करण्यात आले. त्याचसोबत विद्यार्थ्यांना खाऊही देण्यात आला.

जागतिक मुख्यालय जर्मन येथे असणाऱ्या हेंकेल या कंपनीची भारतामध्ये सीवूड्स येथेही शाखा आहे. या शाखेतर्फे लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे येथील सर्व विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या वेस्टबिन्सचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले गेले. घरामधील ओला कचरा आणि सुका कचरा स्वतंत्ररीत्या साठवून त्यापासून आपल्याला उपयोगी गोष्टी अर्थात झाडांसाठी उपयोगी पडणारे खत तयार करता येते आणि ते कशा पद्धतीने करता येते याचीही माहिती व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच प्रत्येक शहरात स्वच्छतेची ज्योत असे ब्रीदवाक्य असणाऱ्या या संस्थेमार्फत आलेल्या सर्वच अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व तर सांगितलेच शिवाय याच माध्यमातून भविष्यामध्ये हरितक्रांती घडवून आणता येईल, असेही आपल्या वक्तव्यातून सांगितले.

यावेळी हेंकेल कंपनीचे प्रमुख भूपेश सिंह शुभांशु ममगेन, प्रवीण कुमार यादव, राकेश पाटील, अविनाश साधवांनी, प्रिया राय अक्षता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी नेहमीच काहीतरी अनोखे करण्याचा मानस असणाऱ्या तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जागृती निर्माण व्हावी यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी सर्वच उपस्थित असणाऱ्यांचे स्वागत केले. तसेच त्यांनी सांगितलेल्या स्वच्छतेच्या महत्त्वाचा संदेश विद्यार्थी नक्कीच अमलात आणतील असा विश्वासही दिला. यावेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजूडकर, नेहा खन्ना, कोमल गायकवाड तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## नेरूळ पोलिसांकडून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा आणि नशामुक्तीचे धडे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ पोलीस ठाण्याच्या वतीने सायबर जनजागृती, नशामुक्ती आणि महिला सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. वपोनि अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. २०) नेरूळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय लाड आणि पोलीस उपनिरीक्षक कीर्ती चव्हाण यांनी शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले.




यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी उपायुक्त दत्तात्रय नागरे, शिव वाहतूक सेनेचे अध्यक्ष दिलीप आमले, पोलीस जावेद बागवान यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.पोलीस निरीक्षक संजय लाड यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत सविस्तर माहिती देऊन जागृती केली. विद्यार्थिनी आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी घ्यावयाच्या आवश्यक उपाययोजना त्यांनी सांगितल्या. तसेच फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवरील अकाऊंट व फोटोंचा गैरवापर कसा होऊ शकतो याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सावध केले.

पोलीस उपनिरीक्षक कीर्ती चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी कोणती दक्षता घ्यावी आणि निर्भया पथकाचे कार्य काय आहे याची माहिती दिली. गुड टच व बॅड टचसारख्या संकल्पना समजावून सांगितल्या. शिव वाहतूक सेनेचे अध्यक्ष दिलीप आमले यांनी 'सावध रहा, जागृत रहा. आपल्या आजूबाजूला काही चुकीचे घडत असेल तर तातडीने पोलिसांना माहिती द्या,' असे आवाहन केले. विद्यार्थिनींनी चुकीच्या गोष्टींच्या आहारी न जाता छंद जोपासावेत, असा सल्लाही त्यांनी दिला.

## 'सीकेटी'त भारतातील व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणावर व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागातर्फे सोमवारी (दि. २०) "भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रो.डॉ. बी .एस. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. अरविंद मोरे (सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी) बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल, यांनी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना "भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या विषयावर मार्गदर्शन केले.

"भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या व्याख्यानामध्ये भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण हे का? केव्हा? आणि कोणत्या कारणामुळे झाले तसेच सध्या व्यापारी बँकांसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या व्याख्यानासाठी



अर्थशास्त्र विभागाच्या एकूण ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

"भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण" या आयोजित व्याख्यानाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील,अ य.क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी.आघाव यांचे मार्गदर्शन लाभले. या व्याख्यानाचे सूत्रसंचालन प्रा. एच. एस खरात आणि व्याख्यानाचे आभार प्रदर्शन डॉ. के. बी.ढोरे यांनी केले. या व्याख्यानासाठी प्रा. निलिमा अरविंद मोरे यांचीदेखील उपस्थिती लाभली.

## उरणमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी उरणच्या वतीने आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवारी (दि. २२) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत उरण तालुक्यातील चार ठिकाणी होणार आहे.

तेरापंथ हॉल, वाणी आळी, उरण, करंजा मच्छीमार सोसायटी करंजा वरील हॉल, जेएनपीटी मल्टीपर्पज हॉल, टाऊनशिप, पी. पी. खारपाटील हायस्कूल, चिरनेर, ता. उरण अशी शिबिराची ठिकाणे आहेत.

सर्व नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी केले आहे. या शिबिराला महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य तथा उरण नगर परिषद उपनगराध्यक्ष रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह आणि सर्व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभणार आहे.

## संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे वर्षासहलीसह वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्था, पनवेल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पावसाळी सहल, डब्बा पार्टी आणि वृक्षारोपण ही अनोखी निसर्ग सहल रविवारी उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडली. पनवेलच्या अदाई डोंगरावर आयोजित या उपक्रमात संस्थेतील महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

पावसाळी वातावरणात डोंगर चढत सहभागी महिलांनी ट्रेकचा आनंद घेत डोंगरमाथ्यावर वृक्षारोपण केले. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत निसर्गाशी नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान सर्वांनी एकत्र येत डब्बा पार्टीचा आनंदही लुटला, ज्यामुळे उपक्रमात एक वेगळाच उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. संस्थेच्या वतीने अशा उपक्रमांद्वारे पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असून, भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी सांगितले.

यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व पनवेल ट्रॅकर्स व इतर मदत करणाऱ्या सदस्यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

## मराठी शाळांसाठी मराठी अभ्यास केंद्राची बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

मराठी शाळांसाठी मराठी अभ्यास केंद्राची जाहीर बैठक मंगळवारी (दि. २१) वाशी येथे आयोजित करण्यात आली आहे. सेक्टर ९-ए येथील गुरव ज्ञाती समाज हॉलमध्ये सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ही बैठक होणार आहे. या बैठकीला मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष तथा शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समितीचे निमंत्रक डॉ. दीपक पवार मार्गदर्शन करणार आहेत.

नवी मुंबईतील सर्व मराठी व महाराष्ट्रप्रेमींनी बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. माहितीसाठी ९००४४२०८२३ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.

## सानपाड्यात ऑर्थोपेडिक क्लिनिकचे उद्घाटन

**नवी मुंबई : वार्ताहर**

सानपाडा सेक्टर १ येथे प्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. आदर्श पाटील यांच्या नूतन ऑर्थोपेडिक क्लिनिकचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शनिवारी (दि. १८) झाले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.



उद्घाटन समारंभाला आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, नगरसेवक सूरज पाटील, नगरसेविका माधुरी सुतार, शैला पाटील, शुभांगी पाटील, शशिकला पाटील, शिल्पा ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते नामदेव भगत, राहुल पिंगळे, सुधीर दाणी, सुभाष हांडे-देशमुख, परशुराम ठाकूर, गणेश कमळे, अभिनेता अशोक पालवे, डॉ. रवींद्र इंगळे, डॉ. उसनाळे, डॉ. भूषण जैन, डॉ, सांगळे, डॉ. श्रीमंत जगताप, माजी जिल्हाधिकारी सुनील शेळके, माजी उपआयुक्त दत्तात्रय नागरे, चंद्रकांत तायडे आदी उपस्थित होते. मंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे आणि महापौर सुजाता पाटील यांनी डॉ. आदर्श पाटील यांच्या वैद्यकीय कौशल्याचे कौतुक केले.

## तळोजा, खारघर, उलवेसह पाच ठिकाणी ईडब्ल्यूएस घरांसाठी सिडकोची संगणकीय सोडत

**सिडको : वृत्तसेवा**

सिडकोच्या "माझे पसंतीचे सिडकोचे घर-माझा 1st चॉइस" गृहनिर्माण योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या ८,७९५ सदनिकांची संगणकीय सोडत सोमवारी (दि. २०) सिडको भवन, सीबीडी बेलापूर येथे झाली. सोडत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल यांच्या हस्ते पार पडली.



यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, डॉ. राजा दयानिधी, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, संचालक (आयटी) एनआयसी नरेंद्र भामरे, उपसंचालक (आयटी) एनआयसी हबीबा ए. एल., (प्र.) महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) श्रीनिवास मोकळीकर यांच्यासह सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अश्विन मुद्गल म्हणाले, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना हक्काची घरे उपलब्ध करून देणे सिडकोचे लक्ष्य आहे. उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व नामांकित कंपन्यांकडून तयार करण्यात आलेला आराखडा यामुळे सिडकोची घरे गुणवत्तापूर्ण आहेत. सोडत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील सदनिकांसाठी होती. इतर प्रवर्गातील सदनिकांची सोडत उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात आली आहे.

डिसेंबर २०२५मध्ये सुरू योजनेंतर्गत तळोजा, कळंबोली, खारघर, उलवे व खारकोपर येथे ८,७९५ EWS सदनिका उपलब्ध होत्या. १०,८३२ अर्ज प्राप्त झाले. ही सोडत अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पडली. यशस्वी अर्जदारांची यादी www.cidcohomes.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.



# माणगावला स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची गरज

## पाच तालुक्यांतील हजारो नागरिकांची आग्रही मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती आणि वेगाने विकसित होत असलेल्या माणगाव शहराला स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची प्रशासकीय इमारत मिळणे ही आता केवळ मागणी राहिलेली नसून जनतेची अत्यावश्यक गरज बनली आहे. सध्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाचे कामकाज तहसील कार्यालयाच्या इमारतीतून सुरू असल्याने जागेचा प्रचंड अभाव, वाढती गर्दी, अपुरी सुविधा आणि वाढलेला प्रशासकीय ताण यामुळे अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांना रोजच मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दररोज सकाळपासून तहसील कार्यालयात नागरिकांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसतात. महसूल, जमीन विषयक प्रकरणे, अपील, निवडणूक कामकाज, विविध प्रकारचे दाखले, शैक्षणिक प्रमाणपत्रे, वारसा नोंदी, जमिनीचे वाद, सुनावण्या अशा अनेक कामांसाठी नागरिक दूरदूरच्या गावांतून माणगावला येतात. मात्र अपुरी जागा, मर्यादित बैठक व्यवस्था आणि एकाच इमारतीत अनेक विभागांचे कामकाज सुरू असल्याने नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. अनेकांना एकाच कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असून सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सध्या या कार्यालयाच्या अखत्यारीत माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा आणि तळा या तालुक्यांतील नागरिकांचे कामकाज केले जाते. या सहा तालुक्यांतील हजारो लोक दररोज विविध शासकीय कामांसाठी या कार्यालयावर अवलंबून आहेत. दिवसेंदिवस वाढणाऱ्या कामकाजाच्या तुलनेत उपलब्ध जागा अत्यंत अपुरी ठरत आहे. परिणामी, प्रशासनाची कार्यक्षमता कमी होत असून नागरिकांना वेळेत न्याय आणि सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

तहसील कार्यालयाची विद्यमान इमारत आजच्या वाढत्या लोकसंख्येला आणि प्रशासकीय गरजांना पुरेशी राहिलेली नाही. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी स्वतंत्र जागा नसल्यामुळे अधिकाऱ्यांना गोपनीय बैठका, महत्त्वाच्या सुनावण्या आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यातही अडचणी येत आहेत. आधुनिक सुविधा, प्रशस्त दालने, स्वतंत्र अभिलेख कक्ष, नागरिकांसाठी प्रतीक्षागृह आणि डिजिटल सेवा केंद्रांचा अभाव जाणवत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे स्वतंत्र आणि आधुनिक अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत उभारण्यात आली असून त्याचा मोठा फायदा नागरिकांना होत आहे. त्याच धर्तीवर माणगाव येथेही सुसज्ज, प्रशस्त आणि अत्याधुनिक प्रशासकीय इमारत उभारल्यास नागरिकांची कामे अधिक वेगाने, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने पूर्ण होतील. प्रशासनावरील ताण कमी होईल आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही अधिक परिणामकारकपणे काम करता येईल.

विशेष म्हणजे, माणगाव तालुका औद्योगिक, शैक्षणिक, व्यापारी आणि प्रशासकीयदृष्ट्या सातत्याने विस्तारत आहे. आगामी काळात येथील लोकसंख्या, उद्योग, गुंतवणूक आणि शासकीय कामकाज आणखी वाढणार आहे. त्यामुळे योग्य नियोजन करून स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय उभारणे हा दूरदृष्टीचा निर्णय ठरेल.

स्थानिक नागरिक, वकील संघटना, व्यापारी, शेतकरी, सामाजिक संस्था आणि विविध लोकप्रतिनिधींनीही मागणी वारंवार मांडली आहे. मात्र पूर्तता झालेली नाही. त्यामुळे आता शासनाने स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीसाठी जागा निश्चित करून निधी मंजूर करावा, अशी एकमुखी मागणी होत आहे.

## कांबे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना मतदानाचे प्रात्यक्षिक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे येथे सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक कशी असते याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.मतदान केंद्र तयार करून शालेय मंत्रिमंडळ निवड प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया घेऊन करण्यात आली.केंद्र अध्यक्ष तेलंगे मॅडम,मतदान अधिकारी१-घायतिडकं ,मतदान अधिकारी २-गायकवाड मॅडम यांनी काम पाहिले.

मतदान सुरू झाल्यानंतर झोनल अधिकारी श्री तेलंगे सर,कोंडिलकर सर यांनी भेट दिली.या अटीतटीच्या निवडणुकीत विद्यार्थी कैवल्य विनोद कुरंगळे यांना सर्वाधिक मते मिळाली व मुख्यमंत्री म्हणून निवड झाली.तसेच दिव्या दिनेश राजभर हिची उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाली.तसेच आरोग्य मंत्री, सहल मंत्री, परिपाठ मंत्री,बागकाम मंत्री,सांस्कृतिक मंत्री अशा पदांसाठी आवाजी मतदानाने निवड करण्यात आली.विद्यार्थ्यांना काही वेळापुरते मंत्रीपद मिळाल्याने चेहऱ्यावर समाधान दिसून आले.



### महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ | फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in | ई-मेल :- dydeoraigad@gmail.com

क्र/निवडणूक /कार्या ६(२)/डीईओ/ई-निविदा/कावी-०२/२०२६ | दि. २२/०७/२०२६

### ई निविदा सुचना क्रमांक : (२) २०२६-२०२७

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील १५ मतदार मदत केंद्रासाठी कंत्राटी तत्वावर एकुण-१५ डाटा एन्ट्री ऑपरेटर व निवडणूकीच्या कामासाठी आवश्यकतेनुसार लागणारे डाटा एंट्री ऑपरेटर पुरवठा करणेकरीता अनुभवी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ सेवा पुरवठादार कंपन्या/फर्म/एजन्सी यांच्याकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा शासनाच्या www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**कामाचे नाव :-** रायगड जिल्हयातील ०७ विधानसभा मतदार संघामधील १५ तालुक्यातील मतदार मदत केंद्रांसाठी १५ कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा करणे बाबत.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ३६,००,०००/-(अक्षरी रक्कम रूपये-छत्तीस लाख फक्त.) |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५,७००/-(विना परतावा) |
| इसारा / बयाणा रक्कम | रू.९५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पंच्यान्नव हजार फक्त.) |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १,०८,०००/-(रु. एक लाख आठ हजार रूपये फक्त.) |
| कामाचा कालावधी | १ वर्ष |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. २२.०७.२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. २२.०७.२०२६ सकाळी १०.०० वाजता पासून ते<br>दि. ०६.०८.२०२६ सायंकाळी ४.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. ०६.०८.२०२६ सायंकाळी ४.०० वाजता |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ व ठिकाण | दि. २७.०७.२०२६ सकाळी ११.०० वाजता (उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड-अलिबाग यांचे दालन) |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि ०७.०८.२०२६ सायंकाळी ४.३० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड- अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
(किशन ना. जावळे) भा.प्र.से
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी,
रायगड- अलिबाग

**आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी१८२५**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे दुंदरे ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे- दुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| दुंदरे | दिलीपकुमार फतेहलाल खरोदिया | ११ | ६ | ०-१६-००<br>०-०१-००<br>एकूण ०-१७-०० | ०.२८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०७/२०२६
पनवेल

सही/-
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल. ९३२४३७५५०२**

### PUBLIC NOTICE

This is to inform to the general public that, **(1) MR. MOHAN KUMAR JHA, (2) MRS. KAJAL JHA** present partners of **M/S SAI HOMES, having address at Shop No. 8, Soham Exotica, Plot No. 69, Sector – 21, Kharghar, Panvel, Dist – Raigad, Pin – 410210,** have given notice to the partnership firm that

As per partnership deed dated 19th June, 2023, both the partners of above firm i.e. (1) MR. MOHAN KUMAR JHA , and (2) MRS. KAJAL JHA were carrying on the business as per the Partnership Deed executed between these two partners which is now misplaced.Fir logged at kharghar police station on 13/07/2026 having Register id e2n9jd28yo.

All persons, having any claim against the said partners and/or any transaction done by the said partnership firm and if there is any recovery of any amount against the said partners, are required to notify the same in writing along with the supporting documentary evidence to the undersigned at the address given herein below within 14 days from the date hereof otherwise it will be deemed that there are no claims and/or that the same are waived accordingly.

Dated :21.07.2026

**For and on behalf of M/s Sai Homes**

(1) MR. MOHAN KUMAR JHA, (2) MRS. KAJAL JHA (Partners) M/S SAI HOMES Address: Shop No. 8, Soham Exotica, Sector – 21, Plot No. 69, Kharghar, Panvel, Dist – Raigad, Pin – 410210.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि. १९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३३० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ४,१३,७००/- रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे भिंगारवाडी** तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **१. श्री भरत धर्मा राणे २. श्री वसंत धर्मा राणे व ३. विठोबा धर्मा राणे,** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भिंगारवाडी,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ४६/२ | ०- २०-०० | ०-००-०० | ०-२०-०० | २.०२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **०७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०७/२०२६

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व नियम १६ (३) अन्वये संस्थाचे एकत्रिकरण/त्याची मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे ज्यांच्या हित संबंधाना बाधा येईल अशा सदस्यांना, धनकोंना व इतर व्यक्तींना द्यावयाची जाहीर नोटीस. गोकर्ण को.हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म.. पनवेल व श्रीपूजा को.हौ. सो.म. पनवेल यांची नोंदणी रद्द करणेबाबत सदर संस्थेचे आज नोंदणी निबंधक है सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनेवल ता. पनवेल, जि. रायगड हे असून त्यांचा पत्ता कृषि उत्पन्न बाजार समिती आवार ए विंग, पहिला मजला, सहकार नगर, पनवेल, पिन ४१०२०६ असा आहे गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, आकांक्षा को. हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थांकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ पोटकलम (जे) च्या पंरतु काचेंर्ची खंड (ओ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य, धनको आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती यास नोटीस देण्यात येत की, निबंधकांची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या रविवार दि.३०.०६.२६ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत एकत्रिकरणाच्या प्रारंभिक ठराव मंजूर करण्यात आल्यानंतर संस्थेने "गोकर्ण को. हौ.सो.म., पनवेल, आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल व श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे एकत्रिकरण करण्याचे, आपली मालमत्ता व जबाबदाऱ्या "विघ्नहर्ता को.हौ.सो.म., पनवेल या संस्थेमध्ये एकत्रितरित्या हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. एकत्रिकरण करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत पुढील गोष्टी लागू असतील. अ) गोकर्ण को. हौ.सो. म. पनवेल, ब) आकांक्षा को.हौ.सो.म. पनवेल, क) श्रीपूजा को.हौ.सो.म. पनवेल या संस्थाचे 'विघ्नहर्ता को.हौ.सो. म. पनवेल या संस्थेकडे वर्ग होतील व भागभांडवल, प्रवेश फी, सिकिंग फंड, राखीव निधी, ठेव इत्यादी बाबी व तीनही संस्थाचे ताळेबंद एकत्र केल्याप्रमाणे राहतील, नियोजित एकत्रिकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे जिच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत, संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती आल्यास त्या पाठविण्यात आणि एकत्रिकरण केलेल्या संस्थेतील आपले सदसत्व चालू ठेवण्याचा/आपल्या शेअरची, हितसंबंधाची किंवा येणे असलेल्या रक्कमेची मागणी करण्याचा अधिकार आहे. एक महिन्याच्या आंत (नोटीस प्रसिध्द झाल्यापासून) कोणतीही हरकत आली नाही तर हितसंबंधी व्यक्तीची त्या निर्णयास मान्यता आहे असे समजण्यात येईल.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक - २०/०७/२०२६**

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| अध्यक्ष | चेअरमन | खजिनदार |

**गोकर्ण को.ऑप. हौ.सो.म., पनवेल**
**पटेल पार्क बिल्डींग नं ५ परदेशी आळी, पनवेल , जि. रायगड ४१०२०६**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे वाटपपत्र/ करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजुर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | उलवे ६५० | गव्हाण ३२६/३६५<br>गव्हाण ३२६<br>गव्हाण ८<br>वहाळ १३<br>वहाळ ३०५A | ११४/५<br>११५/P ११७/५<br>११२/३<br>२४८/६<br>३८७/३ | ०-९-६<br>०-२७-८ ०-१२-६<br>०-३-५<br>०-८-१<br>०-२९-० | ८०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ७A, सेक्टर-२२, क्षेत्र-७९९.७२ चौ.मी. | मुळ भूधारक कै. दत्तात्रेय धर्मा ठाकूर (मयत) यांचे वारस<br>१) श्रीमती हौसाबाई दत्तात्रेय ठाकूर,<br>२. श्री. रणधीर दत्तात्रेय ठाकूर,<br>३.श्री. निलेश दत्तात्रेय ठाकूर<br>४.श्रीमती ललीता सुनिल पाटील | -- |
| २ | करंजाडे १२४ | करंजाडे १२३ | ३९अ/० | ०-३६-५ | ३०० चौ.मी. | मौजे उलवे, सेक्टर २२, भूखंड क्र. ११/१, क्षेत्र २९९.८५ चौ.मी. | मुळ भूधारक कै. दत्तू हाशा भगत मयत यांचे वारस<br>१) कै. गणा दत्तू उर्फ बाळू भगत यांचे वारस १.१) श्रीमती. सुनिता गणा भगत, १.२) श्री. अस्मित गणा भगत, १.३) श्रीमती. अस्मिता महेश पाडेकर उर्फ अस्मिता गणा भगत<br>२) श्रीमती.वनिता कैलास म्हात्रे ३) श्री. सुबोध बाळाराम ठोंबरे ४) श्रीमती. हर्षला हनुमान खुटले ५) श्री. संतोष अनंता पाटील<br>६) श्रीमती. सुनिता नामदेव पाटील<br>७) श्रीमती. ताराबाई शंकर खुटले | निरंक |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-३६-५** | | | | |
| ३ | रोडपाली | ५० | ५१/२ | ०-०२-३ | प्रत्येकी ४० चौ.मी. | भूखंड क्र. ६अ/३क, सेक्टर २०, क्षेत्र ४० चौ.मी. कळंबोली नोड | पुसुबाई चिंध्या घरत उर्फ फसुबाई मंगळ्या थळे | निरंक |
| ४ | रोडपाली १४४ | ३अ/१० | १२१/६ | ०-२१-० | ५०० चौ.मी. | भूखंड क्र. ६ए/३एच, सेक्टर २०, क्षेत्र ५० चौ.मी. कळंबोली नोड | **कै. गोमा गण्या पाटील(मयत)** यांचे वारस श्री. रामदास गोमा पाटील (मयत) यांचे वारस १.१)श्रीमती पार्वती रामदास पाटील, १.२)श्री अरुण रामदास पाटील १.३)श्री. राम रामदास पाटील<br>२)कै.चंद्रकांत गोमा पाटील(मयत) यांचे वारस २.१)श्रीमती सुमती चंद्रकांत पाटील २.२)श्री.विलास चंद्रकांत पाटील २.३)श्री. महादेव चंद्रकांत पाटील | निरंक |
| ५ | | ५५ | ४३७/१३५<br>४३७/१७५<br>४३७/१८३ | ०-१९-०<br>०-०५-०<br>०-१२-१ | | | | |
| ६ | तळोजा १००९+ १०११ | १/२००८ | २५२/१-७<br>२५०/१७ | ०-३१-०<br>०-२१-० | ४५० चौ.मी. पात्रतेपैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र. २६अ, सेक्टर ९, क्षेत्र १५० चौ.मी. | दिवाणी दावा क्र.रे.मु.क्र.-३७४-२०२१, मधील न्यायालयीन आदेशानुसार वादी श्री. दत्तात्रेय बाबुराव कदम यांचे १/३ हिस्स्याप्रमाणे त्यांना इरादित भूखंड क्र. २६अ, सेक्टर-९, क्षेत्र १५० चौ.मी. | -- |
| | | | **एकुण क्षेत्र** | **०-५२-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/१५४/२०२६-२७**

# स्पेन विश्वविजेता

## फिफा वर्ल्डकप फायनलमध्ये बाजी

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्पेनने गतविजेत्या अर्जेंटिनावर १-० असा निसटता विजय मिळवत विश्वविजेतेपदावर पुन्हा एकदा आपले नाव कोरले. अतिरिक्त वेळेत बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या फेरान टोरेसने केलेल्या गोलने स्पेनला २०१०नंतरचे दुसरे जेतेपद मिळवून दिले.



सामन्यातील १०६व्या मिनिटाला जेव्हा सामना गोलशून्य बरोबरीकडे झुकत होता, तेव्हा फेरान टोरेसने सामन्याचे चित्र बदलले. बॉक्समध्ये उसळलेल्या चेंडूवर झडप घालत टोरेसने आपल्या डाव्या पायाने क्रॉसबारच्या खालून चेंडू थेट जाळीत मारला. हा गोल केवळ सामन्याचा निकाल ठरवणारा नव्हता, तर अर्जेंटिनाचे सलग दुसऱ्यांदा विश्वविजेते बनण्याचे स्वप्न धुळीस मिळवणारा ठरला.

मैदानावरील चित्र पूर्णपणे स्पेनच्या बाजूने होते. स्पेनने सामन्यात सुरुवातीचे २० शॉट्स गोलवर मारले, तर अर्जेंटिनाने अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात आपला पहिला प्रयत्न केला. स्पेनने पहिल्या १०पैकी नऊ कॉर्नर किक्स मिळवून सामन्याची सूत्रे आपल्या हातात ठेवली होती. अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझने या सामन्यात तब्बल १२ विक्रमी बचाव केले, अन्यथा स्पेनच्या गोलची संख्या अधिक असू शकली असती. या विजयासह स्पेन आता सलग ३८ सामने अपराजित राहण्याचा विक्रम नोंदवून फुटबॉलच्या विश्वात निर्विवाद 'किंग' ठरला आहे.

विशेष म्हणजे, स्पेनच्या महिला संघाने २०२३मध्ये जिंकलेला विश्वचषक आणि आता पुरुषांच्या या विजयामुळे स्पेन एकाच वेळी दोन्ही विश्वचषक आपल्या नावावर असलेला पहिला देश बनला आहे. या विजयामुळे स्पेनचे ६५ वर्षीय प्रशिक्षक लुईस दे ला फुएंते हे विश्वचषक जिंकणारे आतापर्यंतचे सर्वात वयस्कर प्रशिक्षक ठरले आहेत.

अंतिम शिट्टी वाजल्यानंतर स्पेनच्या छावणीत जल्लोष सुरू झाला, तर अर्जेंटिनाच्या खेळाडूंच्या डोळ्यात हार पचवल्याचे दुःख स्पष्ट दिसत होते. फुटबॉलच्या नव्या युगाची ही सुरुवात स्पेनच्या वर्चस्वाने झाली आहे. सुमारे ८० हजार प्रेक्षक स्टेडियममध्ये, तर जगभरातील अब्जावधी लोक टीव्ही स्क्रीनवर या अटीतटीच्या मुकाबल्याचे साक्षीदार झाले.

### मेस्सीसह अर्जेंटिना गपगार!

अर्जेंटिनासाठी हा सामना कठीण राहिला. सामन्याच्या दुसऱ्या हाफच्या अतिरिक्त वेळेत एन्झो फर्नांडिसला पाऊ कुबार्सीवर केलेल्या बेपर्वा टॅकलमुळे दुसरे पिवळे कार्ड मिळाले आणि त्याला मैदानाबाहेर जावे लागले. यामुळे अर्जेंटिनाला १० खेळाडूंसह सामना पूर्ण करावा लागला. लिओनेल मेस्सीसाठी हा बहुधा शेवटचा विश्वचषक सामना होता, परंतु स्पेनच्या खेळासमोर त्याला व संघाला झुकते माप घ्यावे लागले.

# रोहित शर्माचे लॉर्ड्सवर ऐतिहासिक शतक

## सचिनचा विक्रमही मोडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी सलामीवीर रोहित शर्माने लॉर्ड्स मैदानावर इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावत पुन्हा एकदा आपल्या टीकाकारांना बॅटने उत्तर दिले. या शतकासह रोहितने एक मोठा विक्रमही आपल्या नावावर केला. इंग्लंडमध्ये खेळताना त्याने आठवे शतक झळकावले आणि परदेशात एका देशाविरुद्ध सर्वाधिक शतके करण्याचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मागे टाकला.

३८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहितने दमदार फलंदाजी करत ११० चेंडूत १३८ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने १७ चौकार आणि पाच षटकार ठोकले. रोहितने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत पहिल्या ५० चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर कर्णधार शुबमन गिलसोबत त्याने १४७ धावांची महत्त्वाची भागीदारी रचली. पुढे आणखी वेगाने धावा करत त्याने आपल्या कारकिर्दीतील ३४वे एकदिवसीय शतक पूर्ण केले.

सचिनने एका देशात सात शतके केली होती, तर आता रोहितच्या नावावर इंग्लंडमध्ये आठ शतके झाली आहेत. रोहितच्या एकदिवसीय कारकिर्दीतील एकूण ३४ शतकांपैकी २२ शतके परदेशात आणि १२ शतके भारतात आली आहेत. इंग्लंडव्यतिरिक्त त्याने ऑस्ट्रेलियात सहा, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, झिम्बाब्वेत प्रत्येकी दोन, तर संयुक्त अरब अमिरात आणि बांगलादेशमध्ये एक शतक झळकावले आहे.



या ऐतिहासिक खेळीनंतर रोहितच्या बॅटबाबत एक अत्यंत रंजक आणि खास किस्सा समोर आला आहे. रोहित शर्माने लॉर्ड्सवर ठोकलेले हे शतक स्वतःच्या बॅटने नाही, तर भारतीय अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरच्या बॅटने मारले होते! या गोष्टीचा खुलासा खुद्द शार्दुलने केला आहे. त्याने सांगितले की, तो 'एसएस' कंपनीच्या बॅट्स वापरतो आणि कंपनीचे मालक जतिन सरीन त्याला उत्तम दर्जाच्या बॅट्स पाठवतात. एकदा या बॅट्स पाहून रोहितला त्या खूप आवडल्या आणि त्याने माझ्याकडे दोन बॅट्स मागितल्या. त्याला बॅट देण्यास नकार देण्याचा प्रश्नच नव्हता.

# भारताला हरवून इंग्लंडने वनडे मालिका जिंकली

**लंडन : वृत्तसंस्था**

लंडन येथील ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि निर्णायक वनडे सामन्यात इंग्लंडने भारताचा २७ धावांनी पराभव केला. इंग्लंडने दिलेल्या ३८८ धावांच्या अवाढव्य आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ ५० षटकांत ७ बाद ३६० धावांपर्यंतच मजल मारू शकला.




रोहित शर्माने झळकावलेले शानदार शतक आणि सलामीची ९१ धावांची भागीदारी वाया गेल्याने भारताला मालिका २-१ अशी गमवावी लागली. गुडघ्याच्या दुखापतीमुळे जसप्रीत बुमराह या सामन्यात खेळू शकला नाही, ज्याचा फटका भारतीय गोलंदाजीला बसला.

इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यजमान संघाने लॉर्ड्स मैदानावरील सर्वोच्च वनडे धावसंख्येचा नवा विक्रम नोंदवला. बेन डकेटने १३५ चेंडूत १४१ धावांची वादळी खेळी केली. युवा खेळाडू जेकब बेथेलने ९३ चेंडूत ९१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. जो रूट (४८ चेंडूत ७४*) आणि जोस बटलर (१३ चेंडूत ४१*) यांनी अखेरच्या षटकांत भारतीय गोलंदाजीची पिसे काढली.


३८८ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली, पण अखेरच्या षटकांत संघ रेंगाळला. रोहित शर्माने ११० चेंडूत १३८ धावांची अप्रतिम खेळी केली. लॉर्ड्स मैदानावर वनडे शतक झळकावणारा तो पहिला भारतीय सलामीवीर ठरला. कर्णधार शुबमन गिलने ८४ चेंडूत ७७ धावा करत रोहितसोबत पहिल्या विकेटसाठी ९१ धावा जोडल्या.

विराट कोहलीने ६० चेंडूत ७४ धावा करून भारताच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या, मात्र अखेरच्या षटकांत सॅम करनने चार बळी घेतले आणि भारताचा डाव ३६० धावांवर रोखला. या पराभवासोबतच भारताने ही तीन सामन्यांची वनडे मालिका १-२ अशी गमावली आहे.

# किलियन एम्बाप्पेचा सलग दुसऱ्यांदा गोल्डन बूटवर कब्जा; गोल्डन बॉलचा रोड्री मानकरी

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद स्पेनने पटकावले असले, तरी स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा मान मिळवणारा गोल्डन बूट पुरस्कार फ्रान्सचा स्टार स्ट्रायकर किलियन एम्बाप्पे याने जिंकला. एम्बाप्पेने संपूर्ण स्पर्धेत तब्बल १० गोल करत सलग दुसऱ्यांदा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आपल्या नावावर केला. यापूर्वी त्याने २०२२मध्येही गोल्डन बूट जिंकला होता. दरम्यान, इतर पुरस्कारांमध्ये स्पेनच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले.



फ्रान्सचा एम्बाप्पे याने आठ सामन्यांत १० गोल करत गोल्डन बूट जिंकला. सलग दोन विश्वचषक स्पर्धांमध्ये गोल्डन बूट जिंकणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरला. याशिवाय विश्वचषक इतिहासात २२ गोलांसह सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होण्याचाही मान त्याने पटकावला.

स्पेनचा कर्णधार रोड्री याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गोल्डन बॉल पुरस्काराने गौरविण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत त्याने मिडफिल्ड प्रभावीपणे सांभाळत संघाच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली. स्पेनचा गोलरक्षक उनाई सिमोन याने संपूर्ण स्पर्धेत दमदार कामगिरी करत गोल्डन ग्लोव्ह पुरस्कार जिंकला. स्पेनने संपूर्ण स्पर्धेत केवळ एकच गोल स्वीकारला, तर सिमोनने सलग ६५० मिनिटे एकही गोल न स्वीकारण्याचा विक्रमही नोंदवला.

१९ वर्षीय बचावपटू पाऊ कुबार्सी याला उत्कृष्ट बचावात्मक कामगिरीबद्दल सर्वोत्कृष्ट युवा खेळाडू पुरस्कार



मिळाला. त्याच्या कामगिरीमुळे स्पेनने स्पर्धेत सर्वात कमी गोल स्वीकारणारा संघ म्हणून विक्रम केला.

सिल्व्हर बूट व बॉल लिओनेल मेस्सी (अर्जेंटिना), ब्राँझ बूट जूड बेलिंगहॅम (इंग्लंड), ब्राँझ बॉल किलियन एम्बाप्पे (फ्रान्स) यांनी पटकाविला, तर संपूर्ण स्पर्धेत शिस्तबद्ध आणि खेळाडूवृत्तीपूर्ण कामगिरी केल्याबद्दल नेदरलँड्स संघाला फेअर प्ले पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# स्मिथ 'प्लेयर ऑफ द मंथ'

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयीसीसी) जून महिन्याच्या प्लेअर ऑफ द मंथ पुरस्काराची घोषणा केली आहे. न्यूझीलंडच्या नाथन स्मिथला या पुरस्काराने गौरवण्यात आले.

विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेंतर्गत (डब्ल्यूटीसी) इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत स्मिथने शानदार कामगिरी केली होती. न्यूझीलंडने ही मालिका २-१ अशी जिंकली आणि त्यात स्मिथचा मोठा वाटा होता. या पुरस्कारासाठी शुबमन गिल आणि बांगलादेशचा मोसादेक हुसेन ही दोघे शर्यतीत होती, पण दोघांनाही मागे टाकत स्मिथने पुरस्कारावर नाव कोरले.

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत स्मिथने १६ विकेट्स घेत खास छाप सोडली होती. या मालिकेत त्याला 'प्लेअर ऑफ द सीरिज' पुरस्कारही मिळाला होता.

# २०२७चा क्रिकेट वर्ल्डकप टीम इंडिया जिंकणार : सोशल मीडियावर योगायोगाची चर्चा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या अर्जेंटिनावर १-०ने मात करत स्पेनने विश्वविजेतेपदावर नाव कोरले. फिफा विश्वचषक स्पर्धेतील स्पेनचे हे दुसरे विजेतेपद असून २०१० साली पहिल्यांदा विश्वचषक जिंकणाऱ्या स्पेनने १६ वर्षांनंतर पुन्हा एकदा विजेतेपदाला गवसणी घातली आहे. स्पेनच्या या विश्वविजेतेपदानंतर भारतीय क्रीडा जगतात एका आगळ्यावेगळ्या योगायोगाची चर्चा सुरू झाली आहे.

क्रीडाक्षेत्रामध्ये कुठलाही संघ कितीही बलाढ्य असला तरी त्या दिवशी कोण चांगला खेळतो यावरच विजेतेपद निश्चित होते, मात्र असे असले तरी खेळांमध्ये योगायोगांचीही चर्चा नेहमीच होत आहे. असाच एक योगायोग सध्या चर्चेत आला आहे तो म्हणजे फुटबॉलमधील स्पेनचे विश्वविजेतेपद आणि क्रिकेटमधील भारतीय संघाचे विश्वविजेतेपद यांच्यामधला.

ज्या वर्षी स्पेन फुटबॉल विश्वचषक जिंकतो त्याच्या दुसऱ्या वर्षी होणाऱ्या क्रिकेट विश्वचषकामध्ये भारतीय संघ विजेतेपद पटकावतो, असा तो योगायोग आहे. २०१० साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत स्पेनने अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात नेदरलँड्सचा १-० अशा फरकाने पराभव करत पहिल्यांदा विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर पुढील वर्षी २०११मध्ये भारतात आयोजिक करण्यात आलेल्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद पटकावले होते.

आता तब्बल १६ वर्षांनंतर हा योगायोग पुन्हा जुळून आला आहे. २०१०नंतर स्पेनने पुन्हा विश्वचषक जिंकला आहे, तर पुढील वर्षी २०२७मध्ये आयसीसी क्रिकेट वर्ल्डकप दक्षिण आफ्रिकेत आयोजित होणार आहे. त्यामुळे २०१०चे स्पेनचे विजेतेपद आणि २०११ साली भारतीय संघाला मिळालेले विजेतेपद पाहता आता २०२६ला स्पेनला मिळालेल्या विजेतेपदानंतर आता २०२७मध्ये भारतीय क्रिकेट संघाचे विश्वविजेतेपद निश्चित आहे, असा दावा क्रिकेटप्रेमींकडून करण्यात येत आहे.

# निवृत्तीच्या चर्चांवर रोहित शर्माने सोडले मौन; टीकाकारांना सुनावले

**मुंबई : प्रतिनिधी**

तिसऱ्या वनडेत भारतीय संघाचा थोडक्यात पराभव झाला असला तरी या लढतीत शतक ठोकून एकदिवसीय सामन्यात लॉर्ड्सवर शतकी खेळी करणारा पहिला भारतीय क्रिकेटपटू होण्याचा मान रोहित शर्माने पटकावला तसेच निवृत्तीवरून उलटसुलट चर्चा करत असलेल्या टीकाकारांची बोलतीही रोहितने या खेळीच्या माध्यातून बंद केली.



निवृत्तीच्या चर्चा सुरू असतानाच इंग्लंडविरुद्ध झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माने ऐतिहासिक शतकी खेळी केली. या लढतीत मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाचा थोडक्यात पराभव झाला असला तरी या लढतीत शतक ठोकून एकदिवसीय सामन्यात लॉर्ड्सवर शतकी खेळी करणारा पहिला भारतीय क्रिकेटपटू होण्याचा मान रोहित शर्माने पटकावला.


दरम्यान, या खेळीनंतर रोहितने प्रथमच मौन सोडताना एकदिवसीय क्रिकेटमधील पुढील वाटचालीबाबत महत्त्वपूर्ण संकेत दिले आहेत तसेच रोहितने यावेळी टीकाकारांनाही शेलक्या शब्दात सुनावले आहे. बीसीसीआयने शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये रोहित शर्माने सांगितले की, मी माझ्या संपूर्ण कारकिर्दीत केवळ एका गोष्टीकडे लक्ष दिले आहे ती गोष्ट म्हणजे मैदानावरील कामगिरी. बाकी कोण काय बोलतो याला मी फारसे महत्त्व देत नाही.

रोहित शर्माने पुढे सांगितले की, बॅटद्वारे चांगली कामगिरी करणे हे फलंदाज म्हणून माझे एकच काम आहे. मैदानावर उतरायचे, आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करायचे आणि संघासाठी खेळायचे ही जबाबदारी पदार्पणापासून माझ्यावर सोपवण्यात आलेली आहे. मी ती जबाबदारी पार पाडत आहे.

# पराभवानंतर मेस्सी झाला भावूक!

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्पेनने अर्जेंटिनावर १-० असा विजय मिळवत विजेतेपद पटकावले. अतिरिक्त वेळेतील फेरान टोरेसच्या निर्णायक गोलामुळे स्पेनने दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकला. या पराभवानंतर अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी भावूक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



अंतिम शिट्टी वाजल्यानंतर स्पेनचे खेळाडू विजयानंद साजरा करत असताना मेस्सी काही काळ मैदानावर शांत बसून राहिला. त्याच्या चेहऱ्यावर पराभवाची निराशा स्पष्ट दिसत होती. पुरस्कार वितरणावेळी गळ्यात रौप्यपदक घालून उभा असलेला मेस्सी वारंवार अर्जेंटिनाच्या चाहत्यांकडे पाहत होता. त्याच्या भावनिक क्षणांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत.

३९ वर्षीय मेस्सीसाठी हा विश्वचषक कारकिर्दीतील अखेरचा सामना ठरू शकतो.

# स्पेन-अर्जेंटिनाच्या खेळाडूंमध्ये राडा

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

स्पेन आणि अर्जेंटिना यांच्यात खेळवण्यात आलेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये मॅच सुरू झाल्यापासून ते अगदी मॅच संपल्यानंतरही खेळाडूंच्यात राडा झाल्याचे पाहायला मिळाले. स्पेनच्या बचाव भेदण्यासाठी अर्जेंटिनाच्या संघाने लढतीला सुरुवात झाल्यापासून स्पॅनिश खेळाडूंना धक्का देण्याचा खेळ खेळला. सामन्यातील निर्धारित वेळेतील शेवटच्या क्षणात रेड कार्डच्या रुपात अर्जेंटिनाला मोठी किंमत मोजावी लागली.



स्पेनविरुद्ध १-० असा पराभव झाल्यानंतरही तेच चित्र पाहायला मिळाले. अर्जेंटिनाचा स्टार मिडफिल्डर लिएँड्रो पारेदेस याचा बार्सिलोनाचे खेळाडू गावी आणि एरिक गार्सिया यांच्याशी वाद झाला. या धक्काबुक्कीनंतर रेफरींनी पारेदेसला दुसरे पिवळे कार्ड दाखवत रेड कार्ड दिले.

अतिरिक्त वेळेत फेरान टोरेस याने केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर स्पेनने विश्वचषकावर दुसऱ्यांदा नाव कोरले, मात्र अंतिम शिट्टीनंतर पारेदेसचा संताप अनावर झाला. त्याने एरिक गार्सियाच्या गळ्यावर हात ठेवल्याचे दिसून आले. त्यानंतर मध्ये पडलेल्या गावीसोबतही त्याची झटापट झाली. या प्रकारानंतर सामन्यातील रेफरींनी पारेदेसला दुसरे पिवळे कार्ड दाखवत रेड कार्ड दिले. त्यामुळे अर्जेंटिनाला सामना संपल्यावर दुसरे रेड कार्ड मिळाले.

यापूर्वी नियमित वेळेच्या अखेरीस एन्झो फर्नांडेझ यालाही दोन पिवळ्या कार्डनंतर मैदानाबाहेर जावे लागले. परिणामी अतिरिक्त वेळेत अर्जेंटिनावर १० खेळाडूंसह खेळण्याची वेळ आली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com